# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 29 ) 15th February 2004 ( No : 2


(३)

# खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना चार आर्थिक वर्षातील वेतनेतर अनुदान वितरित न होणे,

*महाराष्ट्र विधानपरिषद : सोमवार, १६ डिसेंबर २००२ : तिसरे अधिवेशन २००२*

**सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते व व्ही.डी.खोटरे** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** (नागपूर विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील सुमारे १०,२१८ खाजगी माध्यमिक शाळा व १३८७ कनिष्ठ महाविद्यालयांना एप्रिल १९९८ ते मार्च २००२ या ४ आर्थिक वर्षात रु.२२८ कोटी वेतनेतर अनुदानापैकी चालू आर्थिक वर्षात केवळ ४२ कोटी रुपयाचे अद्याप वितरण न होणे, रु.१८० कोटीची आवश्यकता असणे, निधीअभावी शैक्षणिक कार्यावर झालेला विपरित परिणाम, दिनांक ११ व १२ डिसेंबर २००२ रोजी नागपूर अधिवेशन काळात महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने अनुक्रमे आयोजित केलेले धरणे व मोर्चा आंदोलन, आर्थिक तरतूद उपलब्ध न केल्याने शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**श्री.राजेंद्र शिंगणे** (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन**

राज्यातील अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार अनुज्ञेय बाबीवर वेतनेतर अनुदान मंजूर केले जाते. गेल्या वर्षापर्यंत या योजनेकरिता दरवर्षी जेवढा निधी उपलब्ध झाला तेवढा निधी त्या, त्या वर्षी वितरित करण्यात आलेला आहे.

पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू केल्यामुळे वेतनावरील खर्चात सुमारे ४० टक्के वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे ही वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आल्यामुळे त्याची थकबाकीही देण्यात आलेली आहे. जो निधी उपलब्ध होतो, त्याचा प्रथमतः वेतनासाठी विनियोग केला जातो. त्या, त्या वर्षी वेतन अनुदान अदा केल्यानंतर जर निधी शिल्लक राहिला तर तेवढा निधी वेतनेतर बाबीसाठी वितरित केला जातो.

चालू आर्थिक वर्षी या योजनेकरिता मूळ अर्थसंकल्पाव्दारे रु.४२ कोटी एवढी तरतूद झाली आहे. यापैकी पहिला हप्ता म्हणून रु.२१ कोटी निधीचे वितरण करण्यात आले आहे. **या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था, महामंडळाच्या सुकाणू समितीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर दिनांक ५ ऑगस्ट २००२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार** चालू आर्थिक वर्षी सन १९९८-९९ पर्यंतचे थकित वेतनेतर अनुदान अदा करण्याचे निश्चित झाले आहे. सदरचे थकित वेतनेतर अनुदान पूर्णपणे अदा करण्यासाठी रु.४२ कोटी व्यतिरिक्त आणखी रु.६ कोटीची तरतूद उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वरीलप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार वेतनेतर अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : अध्यक्ष महाराज, ही लक्षवेधी सूचना माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांशी संबंधित आहे. १९९७-९८ चे देय आहे त्या ४२ कोटी पैकी आतापर्यंत शासनाने केवळ २१ कोटी दिलेले आहेत. म्हणजेच १९९७-९८ चे २७ कोटी अद्याप देणे बाकी आहे. काल

(१)

## राज्यातील माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००२*

*बुधवार, दिनांक ३१ जुलै २००२*

**(४१) * २५०४० श्री.नानासाहेब बोरस्ते, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे , श्री.प.म.पाटील, श्री.दिवाकर रावते,श्री.विलास अवचट,श्री.अनंत तरे, श्री.विजय वडेट्टीवार, प्रा.फौजिया खान, श्री.जितेंद्र आव्हाड,श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांना वेतनेतर खर्च भागविण्यासाठी शाळांना शैक्षणिक शुल्कात १० टक्के विकासनिधी आकारण्याची मुभा देण्यात आली आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षापासून राज्यातील माध्यमिक **शाळांना वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे मुंबईतील शाळा चालकांची आर्थिक कोंडी निर्माण झाल्यामुळे जून,२००२ पासून शाळा बंद ठेवण्याचा इशारा दिनांक २ मे २००२ रोजीच्या एका निवेदनाने शासनास दिला आहे हेही खरे आहे काय ;**

(३) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित शाळांना थकित वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे ?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : (१) हे खरे नाही.

(२) **हे खरे नाही.**

(३) चालू आर्थिक वर्षी वेतनेतर अनुदान देण्यासाठी रुपये ४२ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून तो वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

*****

(२)

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयाचे वेतनेत्तर अनुदान वेळेत मिळणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००२*

*शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट २००२*

**(३२) * २५३६९ प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यू. डायगव्हाणे, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते** : ता.प्र.क्र. २२६९० ला दिनांक १४ मार्च २००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांना गत दोन वर्षापासूनच्या देय असलेल्या वेतनेत्तर अनुदानापैकी किती अनुदान अजूनही देण्यात आलेले नाही;

(२) सदर अनुदान वेळेत न देण्याची कारणे काय आहेत;

(३) तसेच, सदर अनुदान विहित वेळेत देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे;

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१), (२) (३) व (४) अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार देण्यात येते. सन २०००-२००१ करिता रु.१३ कोटी २७ लाख व सन २००१-२००२ करिता रु.१२ कोटी ७४ लाख इतके वेतनेतर अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

*****

परवाच्या पुरवणी मागण्यांमध्ये यापैकी ६ कोटी देण्याचे मान्य केले आहे. बजेटमध्ये २१ कोटी देण्याचे मान्य केले पण अजूनही वितरित झालेले नाही. चार वर्षापासूनचे थकित वेतनेतर अनुदान देणे बाकी आहे. ३०.४.२००२ ला लक्षवेधी सुचनेला उत्तर देताना सांगितले होते की, एकंदर २२८ कोटी थकित देणे बाकी आहे. म्हणजे सुमारे पावणेतीनशे कोटी देणे बाकी आहे. मात्र तरतूद केवळ काही कोटीची केलेली आहे. यामुळे शालेय शिक्षण हे पूर्णतः कोलमडलेले आहे. शालेय शिक्षणाशी संबंधातील कोणतीही वस्तु, लॅबमधील वस्तू, इतर साहित्य जे शाळांसाठी खरेदी करावे लागते ते खरेदी करण्यास कोठेही वाव नाही, साधा खडू डस्टर देखील खरेदी करण्यास वाव नाही. माननीय मंत्री महोदय देखील काही शाळा चालवितात, त्यांना याची पूर्ण माहिती असेलच. आज ग्रामीण भागातील पूर्ण शालेय शिक्षण कोलमडलेले आहे. चार वर्षापासूनचे देणे बाकी आहे. या ठिकाणी आता फक्त यासाठी सहा कोटी रुपयाची तरतूद केली आहे. जवळपास आतापर्यंत पावणे तीनशे कोटी रुपयाचे वेतनेतर अनुदान द्यावयाचे आहे. आता हे किती महिन्यात आपण देणार आहात? आता आपण जे २७ कोटी रुपये मंजूर केले आहे, त्याचे वितरण एक महिन्यात करण्यात येईल काय? एक महिन्यात ही रक्कम शाळांपर्यंत पोहोचेल काय?

**श्री.राजेंद्र शिंगणे** : सभापती महोदय, राज्यामधील माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान गेल्या चार ते पाच वर्षापासून दिलेले नाही. १९९८-९९ सालापासून आतापर्यंत जवळ जवळ २२८ कोटी रुपयाच्या वर वेतनेतर अनुदान आपण देवू शकलेलो नाही. यासाठी आपण या वर्षाच्या अंदाजपत्रकात जवळ जवळ ४२ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती. त्यापर्यंत २१ कोटी रुपये आतापर्यंत गेले आहेत. या बाबत राज्याचे सचिव तसेच सुकानु समितीसमोर मागील वेळी चर्चा झाली होती. त्याप्रमाणे १९९८-९९ पर्यन्तचे जे थकित अनुदान आहे, ते देण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे जवळ जवळ ४२ अधिक ६ असे ४८ कोटी रुपयांची गरज होती. त्यापैकी आतापर्यंत २१ कोटी रुपये देण्यात आले आहेत. यामध्ये अजून २७ कोटी रुपये द्यावयाचे राहिले आहेत. आपण यावर्षीच्या पुरवणी मागण्यामध्ये ६ कोटी रुपयाची मागणी केली आहे. त्याप्रमाणे २१ अधिक ६ असे २७ कोटी रुपये या महिनाअखेरपर्यंत अंदा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, दि.३१.४.२००२ रोजी ज्यावेळी या प्रश्नाला उत्तर देण्यात आले होते, त्यावेळी २२८ कोटी रुपये द्यावयाचे राहिले आहेत, असे सांगितले होते. आता जवळ जवळ हा आकडा पावणे तीनशे कोटी रुपये होईल. आता या पावणे तीनशे कोटी रुपयांपैकी ६ कोटी रुपयाची पुरवणी मागणी करण्यात येत आहे. हा दक्षिणा देण्याचा प्रकार आहे. आता विदर्भात अधिवेशन चालू आहे. तेव्हा यातील अर्धी रक्कम एक ते दोन महिन्यांत देतो असे मा.मंत्रिमहोदयांनी सांगावे. आता आपण ज्या प्रकारची कृती करीत आहात त्यावरुन ग्रामीण भागातील शिक्षण बंद करण्याचा, ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणापासून वंचीत करण्याचा धंदा सरकारने सुरु केला आहे काय? म्हणून या अधिवेशनाच्या निमित्ताने यातील अर्धी रक्कम आता देतो असे तरी आम्हाला या ठिकाणी सांगावे.

**श्री.राजेंद्र शिंगणे** : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या ठिकाणी शासनाने धंदा सुरु केला आहे, असे म्हटले आहे. मला या ठिकाणी त्यांना सांगावयाचे आहे की, या ठिकाणी शासनाने कोणताही धंदा सुरु केलेला नाही. सभापती महोदय, शिक्षणावर १९९५-९६ सालापासून जी तरतूद करण्यात येत होती, त्या तरतुदीकडे मी सदनाचे लक्ष वेधीत आहे. १९९५-९६ सालच्या बजेटमध्ये शिक्षणासाठी ३१८४ कोटी रुपयांची तरतूद केली होती. याचा विचार करता १९९९-२००० या वर्षाच्या अर्थसंकल्पात ८५९८ कोटी रुपयाची तरतूद केली आहे. याचे कारण शोधण्याचा कृपया प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. याचे कारण पाचवा वेतन आयोग दिल्यामुळे ही जादा तरतूद करावी लागली आहे. यामध्ये आपण २२२५ कोटी रुपयाची अधिकची तरतूद केली आहे. आता नियमानुसार शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. वेतन दिल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील, त्यातून वेतनेतर अनुदान देण्यात येते. कारण हे अनुदान असते. हे अनुदान उपलब्ध असलेल्या निधीवरच अवलंबून असते. आणि जसजशी निधीची उपलब्धता होईल त्याप्रमाणे वेतनेतर अनुदान राज्यसरकार निश्चितपणे देईल.

**श्री बी.टी.देशमुख** : वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत आपण ही एक भूमिका घेतली आहे, आणि त्यासाठी आपण ९८-९९ चा हिशेब दिला आहे. पूरक मागण्यांमधील बाब क्र. ८४ मध्ये त्याकरिता ६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामध्ये ९८-९९ पर्यंतचे वेतनेतर अनुदान देवून होईल असे निवेदनात म्हटले आहे, ४२ कोटींपैकी २१ अधिक ६ कोटी असे एका महिन्यात देणार. म्हणजे ९९- २०००, २०००-२००१, २००१-२००२ या तीन वर्षाचे वेतनेतर अनुदान देण्याचे अजून शिल्लक आहे. इतके दिवस हे अनुदान थकून राहिल्यामुळे विशेषतः ग्रामीण भागात वेतनेतर खर्चाचा प्रश्न कोसळून पडला आहे. शाळांची विजेची बिले सुध्दा देवून होत नाहीत, याबाबत सर्व ठिकाणी वाईट अवस्था आहे. वीजेची बिले देता येत नाहीत, शाळेमध्ये खडू फळा नाही, डस्टर नाही. याबाबत आपण एक निश्चित कार्यक्रम आखून ९८-९९ पर्यंत` वेतनेतर अनुदान देत आणले आहे. खरे म्हणजे अजिबात अनुदान नसतांनाही गेल्या ३-४ वर्षापासून कशा शाळा चालविल्या जात आहेत हा एक चिंतेचा विषय आहे. उरलेले अनुदान देण्यासाठी यावर्षी दोन, चार किंवा सहा महिन्यांचा एक निश्चित असा कालबध्द कार्यक्रम आपण आखाल काय?

**श्री. राजेंद्र शिंगणे** : माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुख सरांनी सांगितल्याप्रमाणे वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे आज राज्यातील अनेक शाळांमध्ये विविध प्रकारचे प्रश्न उभे राहिले आहेत ही गोष्ट आपल्याला मान्य करावी लागेल. हे वेतनेतर अनुदान देतांना राज्याच्या आजच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन आतापर्यंत झालेल्या चर्चेनुसार आपण ९७-९८ पर्यंतचे थकित वेतनेतर अनुदान दिल्यानंतर उर्वरित ३-४ वर्षाचे वेतनेतर अनुदान देणे बाकी आहे त्या संदर्भात राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. उर्वरित थकित अनुदानाच्या बाबीकरिता आम्ही वित्त, नियोजन आणि शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांची एक संयुक्त समिती तयार केली आहे. या सचिवांकडून शिक्षण विभागाव्यतिरिक्त इतर विभागांकडून शिक्षण विभागासाठी विशेषतः वेतनेतर अनुदानासाठी काही रक्कम प्राप्त करुन घेता येईल, विविध विभागामध्ये जे सेव्हिंग झाले आहे ते या विभागाकडे ट्रान्सफर करुन घेता येईल. ते घेतल्यानंतर आपल्याला राज्यातील उरलेल्या वेतनेतर अनुदानाचा प्रश्न निकालात काढता येईल.

**श्री व्ही.यु.डायगव्हाणे** : सभापती महोदय, मागील वर्षी सुध्दा अशाप्रकारचा प्रयोग झाला. रिॲप्रोपिएशनद्वारे काही निधी प्राप्त झाला. व तो शिक्षण विभागाला दिला. परंतु अशाप्रकारे जो निधी आपण कलेक्ट कराल तो किती असेल हे आपल्याला सांगता येत नाही. आपण ९७-९८ पर्यंतचे अनुदान दिले आहे आणि ९८-९९ चे दिले नाही, चार वर्षाचे अनुदान देणे बाकी आहे. तेव्हा रिॲप्रोपिएशनद्वारे कलेक्ट होणारा निधी कमी पडला तर शासनाच्या बजेटमधून ५० टक्के निधी या अनुदानासाठी प्राप्त करुन देणार काय?

**श्री. राजेंद्र शिंगणे** : या विषयाकरिता जी समिती नेमली आहे, त्या समितीकडे माननीय सदस्यांनी केलेली सूचना विचारार्थ ठेवू. माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व सूचनांचा निश्चितपणे विचार करुन ५० टक्के निधी शिक्षण विभागाकडे वळवून देता येईल काय याबद्दल निश्चितपणे विचार करु.

**श्री प.म.पाटील** : सभापती महोदय, वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे विद्यालयाच्या इमारतीचे भाडे थकित राहीले आहे. अनेक संस्था हे भाडे देऊ शकत नाहीत. त्यामुळे शाळा बंद झाल्या आहेत. तेव्हा हा प्रश्न अतिशय गंभीर आहे, त्यामुळे अनेक संस्थांचे गेल्या चार वर्षाचे भाडे थकित राहीलेले आहे. तर ते देण्याच्या दृष्टीने मार्च पूर्वी तरतूद करणार आहात का?

**श्री. राजेंद्र शिंगणे** : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानामध्ये ज्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्यामध्ये इमारतीच्या भाड्याचाही अंतर्भाव आहे. त्यामुळे जेव्हा हा संपूर्ण प्रश्न निकालामध्ये निघेल त्यावेळी इमारतीचे भाडे देऊ शकू.

**श्री. वसंतराव खोटरे** : सभापती महोदय, एकंदर २१ कोटीचे वाटप करण्यात आलेले आहे. अमरावती विभगामध्ये या सूत्रानुसार ३० लाख रुपयांचा निधी आलेला आहे. पण शिक्षण अधिकाऱ्यांनी त्याचे वाटप न केल्यामुळे हा निधी परत गेला आहे. तेव्हा हा निधी पुन्हा मिळेल का? तसेच बुलढाणा, यवतमाळ, वाशिम इ. भागातील काही निधी देखील परत गेला आहे. हा निधी खास बाब म्हणून परत मिळेल का?

**श्री. राजेंद्र शिंगणे** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जर अशा प्रकारे निधी परत गेला असेल तर तो त्या-त्या जिल्ह्यांना परत मिळण्याची जबाबदारी शासन घेईल. तसेच मी सदनाच्या माहितीसाठी सांगतो की, वेतनेतर अनुदान देत असताना मागच्या वर्षी किंवा त्याच्या मागच्या वर्षी सातत्याने काही तक्रारी येत होत्या की, काही विशिष्ट भागांना हे अनुदान दिले जाते आणि काही भागांना दिले जात नाही, तर या तक्रारीची शासनाने गंभीर दखल घेतलेली आहे . यासंदर्भात देखील वेगळ्या प्रकारचे नियम तयार करुन ज्या जिल्ह्यांना आतापर्यंत अनुदान दिलेले नाही त्यांना ते प्राधान्याने दिले जाईल आणि ज्यांना आतापर्यंत देण्यात आले आहे त्यांना मागे ठेऊन, ज्या भागामध्ये बॅकलॉग आहे त्यांना सुध्दा अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

*****

(४)

# राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००२*

*बुधवार, १८ डिसेंबर २००२*

**(१) * २७२७७ श्री धोंडीराम राठोड, श्री.प.म.पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.जी.एल.ऐनापूरे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे :** सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान सन २००५ पर्यन्त टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे राज्याच्या शिक्षण क्षेत्रात तीव्र असंतोष पसरला आहे हे खरे आहे काय;

**(३) असल्यास, वेतनेत्तर धोरण टप्प्याटप्प्याने बंद करण्याच्या निर्णयाचा फेर विचार शासन करील काय;**

(४) नसल्यास, वेतनेत्तर अनुदान बंद करणे बाबत शासनाची भूमिका काय आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** (१) **काटकसरीची उपाययोजना म्हणून शासनाने घेतलेल्या इतर अनेक निर्णयांपैकी हा एक निर्णय आहे, हे खरे आहे.**

(२) हे अंशतः खरे आहे. परंतु अंमलबजावणीची कार्यपध्दती व वेळापत्रक याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(५)

## राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना ३ वर्षाचे वेतनेतर अनुदान उपलब्ध करणे.

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००२*

*बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २००२*

**(१५) * २७६३९ श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.जी.एल.ऐनापूरे, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे :** ता.प्र.क्र.२६६५९ ला दिनांक ७ ऑगस्ट २००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील खाजगी संस्था अंतर्गत चालणाऱ्या माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा-संस्थांना ३ वर्षाचे थकित वेतनेतर अनुदान २२८ कोटी ८३ लक्ष रुपयांची आवश्यकता असतांना चालू आर्थिक वर्षाच्या संकल्पात केवळ रु.४२ कोटी तरतूद करुन रु.२१ कोटी उपलब्ध करुन दिले, हे खरे आहे काय;

(२) थकित व चालू वेतनेतर अनुदान उपलब्ध करण्यासाठी अमरावती विभाग शाळा व्यवस्थापक मंडळ व मुख्याध्यापक संघ यांनी दिनांक ८ जुलै २००२ रोजी शाळा बंद आंदोलन केले हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे;

(४) अद्यापही कारवाई केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** (१) अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याच्या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाव्दारे उपलब्ध झालेल्या रु.४२ कोटी तरतूदीपैकी पहिला हप्ता म्हणून रु.२१ कोटी तरतूदीचे वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) १९९८-९९ या वर्षापर्यतचे थकीत वेतनेतर अनुदान अदा करण्यासाठी व नमूद केल्याप्रमाणे रु.४२ कोटी व्यतिरिक्त आणखी रु.६ कोटीची गरज असल्यामुळे ती रक्कम उपलब्ध होण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

*****

(३) व (४) वरील निर्णय घेताना सर्व संबंधितांच्या अडचणींचा विचार करुनच शासन निर्णय घेईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनु.क्र.एक वरील प्रश्न आणि अनु.क्र.१५ वरील प्रश्नांचा विषय एकच आहे, तेव्हा हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यात यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती :** मी पाहतो.

**श्री.धोंडीराम राठोड :** सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न असा विचारला आहे की, शासनाने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय? तर या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "हे खरे आहे" असे म्हटलेले आहे. वास्तविक सहा ते चौदा वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची शासनाची जबाबदारी आहे असे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. घटनेप्रमाणे शासनाने ते केले पाहिजे असे संकेत असताना आपण प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेत आहात. खरे म्हणजे ग्रामीण भागामध्ये तेथील संस्था चालकांना कशा परिस्थितीत शाळा चालवाव्या लागतात याची सर्वांना कल्पना आहे. ग्रामीण भागातील शाळांकडे कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. अशा वेळी या शाळा कशा चालवावयाच्या असा मोठा प्रश्न संस्थाचालकांसमोर आहे. तेंव्हा याबाबतीत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य नाही. तेव्हा मा. मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा.

**प्रा. रामकृष्ण मोरे : सभापती महोदय, राजकोषीय सुधारणेच्या संदर्भात वित्त विभागाने काटकसरीच्या उपाययोजना म्हणून केलेल्या सूचनांपैकी ही एक सूचना होती आणि मंत्रिमंडळाने त्या सूचनेला मान्यता दिली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु अनेक ज्या सूचना करण्यात आल्या, त्यातील ही एक सूचना आहे. यासंदर्भातील कोणताही आदेश सामान्य प्रशासन विभागाने, वित्त विभागाने किंवा शिक्षण विभागाने निर्गमित केलेला नाही.** त्यामुळे विद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान शासन बंद करणार आहे वगैरे अशा प्रकारचा कोणताही आदेश निर्गमित केलेला नाही. उलटपक्षी १९९९ मार्च अखेरपर्यंतचे वेतनेत्तर अनुदान द्यावे असा निर्णय घेतला आहे.

भविष्यकाळात देखील वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात हे वेतनेत्तर अनुदान राहिले पाहिजे हिच शिक्षण विभागाची आणि शासनाची भूमिका आहे. उत्तरामध्ये शेवटचे उत्तर दिलेले आहे की, ५ ऑगस्ट रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या महासंघाबरोबर चर्चा झाली असता त्यांनी स्वतः होऊन सांगितले होते की, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भामध्ये आम्ही आपल्याकडे काही प्रस्ताव देतो. वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भातील प्रस्ताव जास्त असू शकतो. कमी असू शकतो किंवा त्याच्या सुधारणा असू शकतात. त्यामुळे त्या संदर्भातील निर्णय घेत असतांना "सर्व संबंधितांशी चर्चा करुनच निर्णय घेतला जाईल." परंतु शासन हे वेतनेतर अनुदान बंद करणार नाही, हे निःसंदिग्ध शब्दात मी सांगू इच्छितो.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मा.मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे, हे महाराष्ट्राला ठामप्रकारचे आश्वासन देणारे उत्तर आहे. परवा सभागृहात चर्चा झाली त्यावेळेला असे सांगण्यात आले होते की, यावर्षी ४२ कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी २१ कोटी रुपये वितरित केले आहेत आणि आणखी २१ कोटी रुपये वितरित करणार आहात. ६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. ते पैसेही वितरित करणार आहोत. त्या दिवशी अशीही चर्चा झाली की, हा निधी जसाजसा उपलब्ध होईल तसेतसे १९९८-९९ पर्यंत येईल आणि बाकीचे नंतर देऊ. शालेय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर स्थायी समितीच्या रिपोर्ट क्रमांक ११ मध्ये याचा उल्लेख आहे. "तसेच वेतनेत्तर अनुदान सन २००५ पर्यत कमी करण्यात येणार आहे असा निर्णय मंत्रिमंडळाने तत्वतः घेतलेला आहे." त्यामुळे हा प्रश्न आला आहे.

आम्ही मुद्दाम टाकला. पहिल्या उत्तरामध्ये ते त्यांनी मान्यही केलेले आहे. नंतर मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, असे शासनाचे धोरण नाही. अशा प्रकारचा कोणताही आदेश निघालेला नाही. सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत १५ व्या क्रमांकावर प्रश्न आहे. त्यामध्ये हे मान्य केलेले आहे. प्रश्न क्रमांक २ मध्ये "दिनांक ८ जुलै २००२ रोजी व्यवस्थापक मंडळ व मुख्याध्यापक संघाने शाळा बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय" असे विचारले आहे. त्याला उत्तर "हे खरे आहे" असे देण्यात आले आहे. ग्रामीण भागामध्ये यामुळे अत्यंत वाईट स्थिती येणार आहे. आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी फक्त मुंबईतील विचार करुन असा विचार करणे हे अत्यंत चुकीचे आहे. आपण याबद्दल जे सांगितले त्याबद्दल मी जरुर धन्यवाद देईल की, आपण म्हटले की, असा आदेश निघाला नाही, आणि असा आदेश काढू नये असे शासनाचे धोरण आहे. माझे म्हणणे असे आहे की, असे कोणतेही धोरण बाहेर निघण्यापूर्वी व्यवस्थापक महामंडळ, मुख्याध्यापकांची संघटना, तसेच अधिकृत शिक्षक संघटनांशी चर्चा केल्याशिवाय हा आदेश निघणार नाही असे आपण सभागृहाला ठामपणे सांगावे.

**प्रा.रामकृष्ण मोरे** : सभापती महोदय, 'होय'

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, परवाच्या प्रश्नाला उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी असे म्हटले आहे की, चार वर्षाचे थकित अनुदान आहे हे जवळ जवळ पावणे तीनशे कोटी रुपये देणे आहे. १९९७-९८ साठी कमी पडत होते तेवढी ६ कोटीची पुरवणी मागणी मंजुर केली आणि बजेटमध्ये ४२ कोटी मंजुर केले. यापैकी २१ कोटी रुपये राहिलेले आहेत आणि हे ६ कोटी रुपये मिळून २७ कोटी रुपये अजून देणे आहेत. परवा प्रश्नाला उत्तर देतांना हे २७ कोटी रुपये एका महिन्यात देऊ असे म्हटलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कारण हे ते बर करणार नाहीत. पण चार वर्षाचे वेतनेतर अनुदान दिले नाही यामुळे शाळांची काय अवस्था आहे हे सुध्दा तपासले पाहिजे. लॅबोरेटरी साहित्य घेण्यासाठी पैसे नाहीत. फर्निचरसाठी पैसे नाहीत. स्टेशनरी घेता येत नाही त्यामुळे कुठले शिक्षण आणि कुठले काय, आणि म्हणून आपण काल म्हटले की, रिॲप्रॉप्रिएशनव्दारे जमा झालेला निधी इकडे वळता करु. हा मार्च पर्यंत निम्मा, दोन वर्षाचा निधी इकडे वळविण्याची व्यवस्था केली जाईल काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : मार्च १९९९ अखेरपर्यंतचे वेतनेत्तर अनुदान देण्याच्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने सभागृहाला जे सांगितले त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भामध्ये मी अगोदरच भुमिका स्पष्ट केलेली आहे. जसजसा निधी उपलब्ध होईल तो जास्तीत जास्त निधी याच्या संदर्भामध्ये मी ठाम आता काही सांगू इच्छित नाही. आपण ते देणारच आहोत हे बंद करणार नाही. मार्च १९९९ अखेरपर्यंतची व्यवस्था ४२ कोटी रुपयांची होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी ६ कोटी रुपये म्हटले आहेत असे मिळून ४८ कोटी रुपये तरतूद केलेली आहे. आपली प्राथमिकता सुरुवातीला वेतनाची आहे.

तसेच पाचवी ते सातवीच्या तुकड्यांच्या समायोजनाची प्राथमिकता आहे. या गोष्टी आपण पुरवणी मागण्यांव्दारे केलेल्या आहेत. वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात...

**श्री.नितीन गडकरी** : वेतन अनुदानाची प्राथमिकता मान्य आहे. आम्हाला खूप शाळांचे लोक भेटतात. ते म्हणतात की, आमच्याकडे प्लास्टर ठेवलेले आहे आणि अनुदान मिळाले की ते काम करु. आपण कोठे तरी कट करा. आपण वेतनेत्तर अनुदान देणार नाही, तीन वर्षात देऊ असे सांगितले जाते. याबाबतीत नवीन काही फॉर्म्युला द्या. ते देण्याची तुमची कमिटमेंट आहे. कायदेशीर जबाबदारी आहे. म्हणून याबाबतीत स्पष्ट सांगितले तर बरे होईल. नाही तर लोकांची फार अडचण होते.

**श्री.रामकृष्ण मोरे** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी स्पष्ट भूमिका मांडण्यास सांगितलेले आहे. हे वेतनेत्तर अनुदान आहे आणि अनुदान हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते.

**श्री.नितीन गडकरी** : केव्हा उपलब्ध होईल?

**श्री.रामकृष्ण मोरे** : जे उपलब्ध झाले त्याचे वाटप कसे करणार याची सुस्पष्ट कल्पना दिलेली आहे. पुढे कधी करणार हे आताच सांगू शकत नाही. या सभागृहात जे जे शब्द वेतनाच्या संदर्भात, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात, तुकड्यांच्या समायोजनाच्या संदर्भात, पाचवी ते सातवीच्या संदर्भात, उच्च माध्यमिकच्या संदर्भात दिले गेलेले आहेत ते पाळलेले आहेत. त्यामुळे शब्द देताना देखील सर्व वस्तुस्थितीचा अंदाज घेऊन बोलावे लागेल, त्यामुळे

## (६)
## राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे ३१ मार्च, २००२ पर्यंतच्या देय वेतनेतर अनुदानाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००२*
*गुरुवार,दिनांक १९ डिसेंबर २००२*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या तेराव्या यादितील प्रश्न क्रमांक (३) २५२३५*

**(३) २५२३५ (५-८-२००२). श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.प.म.पाटील , प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळांचे ३१ मार्च,२००२ पर्यंत एकूण देय वेतनेत्तर अनुदान किती आहे ;

(२) असल्यास, उपरोक्त वेतनेतर अनुदान सन २००५ पर्यंत उपरोक्त शाळांच्या संस्थांना देण्यात येऊ नये, अशा प्रकारच्या सूचना व निर्देश वित्त विभागाने शालेय शिक्षण विभागास दिले आहेत, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, शिक्षण स्थायी समितीने अर्थसंकल्पीय मागण्यासंदर्भात सादर केलेल्या अहवालात उपरोक्त देय असलेल्या वेतनेतर अनुदानाची रक्कम त्वरीत अदा करावी अशी आग्रहाची शिफारस केली आहे,हे खरे आहे काय ;

(४) असल्यास, उपरोक्त शिफारशीसोबत शासनाने निर्णय घेतला काय, असल्यास घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ;

(५) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे ?

**प्रा.रामकृष्ण मोरे** (८-११-२००२) (१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे ३१ मार्च,२००२ पर्यंत एकूण देय वेतनेतर अनुदान रु.२४८.५० कोटी एवढे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) २००२-२००३ या वर्षी अशासकीय अनुदानित प्राथमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी आतापर्यंत रु.६ लक्ष एवढा खर्च झाला असून अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी रु.२१ कोटी रकमेचे वाटप सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

## (७)
## राज्यातील अनुदानीत प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदानात बदल करण्याचा प्रस्ताव

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००२*
*गुरुवार,दिनांक १९ डिसेंबर २००२*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या तेराव्या यादितील*
*प्रश्न क्रमांक (४) २५२४५*

**(४) २५२५४ (७-८-२००२). सर्वश्री प.म.पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, श्री.नानासाहेब बोरस्ते** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय-

(१) राज्यातील अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना विद्यमान सुत्रानुसार देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदानात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय ;

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व अंमलबजावणी कधी पासून केली जाणार आहे ?

**प्रा.रामकृष्ण मोरे** (८-११-२००२) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

यासंदर्भात मी आता काही सांगू इच्छित नाही.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** परवा माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्यामध्ये रिॲप्रोप्रिएशनव्दारे जो निधी उपलब्ध होईल तो पूर्णपणे इकडे वळता केला जाईल असे सांगितले.

**श्री.रामकृष्ण मोरे :** माननीय राज्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने सभागृहाला जे आश्वासन दिलेले आहे ते पाळले जाईल हे मी सांगितलेले आहे. परत माझ्या तोंडातून वदवून घ्यावयाचे आहे काय?

**श्री.धोंडीराम राठोड :** आतापर्यंत वेतनेत्तर अनुदान दिलेले नाही आणि देऊ शकत नाही. आपण ते टप्प्याटप्प्याने देणार आहात परंतु ज्यावेळी शाळेची तपासणी होते त्यावेळी त्या ठिकाणी जर सगळ्या सुविधा उपलब्ध नसतील तर त्या शाळेवर आपण नियमाप्रमाणे कारवाई करता. मग त्या शाळांना या अडचणीना तोंड द्यावे लागते त्यासाठी आपण काय करणार? कारण आपण त्यांची तपासणी करतो आणि ते निकष पूर्ण करु शकत नसतील, त्यांच्याकडे प्रयोगशाळेचे साहित्य नसेल, वाचनालयासाठी पुस्तके नसतील, फर्निचर नसेल, इक्विपमेंट्स नसतील तर त्यांच्यावर कारवाई करतो. हे दुहेरी मापदंड कसे अवलंबिण्यात येते?

**श्री.रामकृष्ण मोरे :** कोणत्याही शाळेला परवानगी देत असताना पूर्वीचे सूत्र चौथ्या वर्षी आणि आताचे सूत्र पाचव्या वर्षी असे आहे. त्यामध्ये असे गृहीत धरले आहे की संस्था चालकांनी वेतन आणि वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात काही वर्षे जबाबदारी घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. बऱ्याच वेळेला २० टक्क्यावर, ४० टक्क्यावर, ६० टक्क्याच्या अनुदानावर आलेली जी विद्यालये असतात त्या ठिकाणी वेतनेत्तर अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे काही असुविधा निर्माण होऊ शकते आणि असतात. त्यामुळे अनुदानाला पात्र होण्यासाठी जे गुणांकन आहे त्या गुणांकनाच्या संदर्भात देखील काही बाबतीत फेरविचार करण्याची शासनाची मानसिकता आहे आणि तो विचार आपल्याला करावा लागेल हे मी निःसंदिग्ध शब्दात सभागृहाला सांगतो.

**श्री.जयंत पाटील :** वेतनेत्तर अनुदान शाळांना देणार आहात त्याबद्दल धन्यवाद. ज्या शाळांना हे वेतनेत्तर अनुदान दिले जाते त्या शाळेमध्ये त्या अनुदानाचा वापर योग्यरितीने होतो की नाही हे बघण्याची आपल्याकडे यंत्रणा आहे काय? असल्यास त्या यंत्रणेने केव्हा आणि किती तपासणी केली? हे वेतनेत्तर अनुदान संस्थांना न देता शाळांना दिले जाते. त्या वेतनेतर अनुदानातील सर्व परचेसींग संस्थाचालक करतात. एका शाळेची, एका संस्थेची एक खुर्ची २ हजाराला मिळते तर दुसऱ्या शाळेची खुर्ची २० हजार रुपयाला मिळते. एका शाळेतील बेंच १२०० रुपयाला तर संस्थेमध्ये १२ हजारपर्यंत केलेले आहे ही तपासणी शासन करणार आहे काय. अशा संस्थांविरुध्द आलेल्या तक्रारींची दखल हे शासन घेणार आहे काय. कारण यामुळे निम्मा पैसा वाचू शकेल. याठिकाणी तुम्ही काटकसर करावी.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** अशा अनेक गोष्टी घडतात, घडू शकतात. याची माहिती मा. सदस्यांनी सभागृहाला दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. हे तपासण्यासाठी व्यवस्था असते, त्याचे ॲसेसमेंट केले जाते.

**श्री.जयंत पाटील :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आमदार म्हणून शासनाकडे पत्र दिलेले आहे त्याची अद्याप दखल घेतली गेली नाही. ज्या तक्रारी केल्या आहेत त्याची चौकशी सुरु आहे. लाखो, करोडो रुपये यामुळे वाचतील अशी परिस्थिती आहे. अशा ४-५ संस्था आहेत, आजच्या तारांकित प्रश्नाच्या यादीमध्ये त्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये गोळा केले जातात आणि त्याकडे काही पाहिले जात नाही, १०-१५ वर्षे अशा संस्थांचे ऑडिट होत नाही अशा संस्थांविरूध्द कोणती कारवाई करणार आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** सन्माननीय सदस्य जी माहिती देतील किंवा दिलेली माहिती आहे त्याची योग्य चौकशी करुन त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**श्री.नानासाहेब बोरस्ते :** वेतनेतर अनुदानाची चर्चा होत असताना मा.मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. म्हणून मला स्पष्ट प्रश्न विचारावयाचा आहे की, आर्थिक काटकसरीच्या नावाखाली शासन टप्प्याटप्प्याने अनुदान बंद करणार आहे असे यात नमूद कले आहे. शासन इतर क्षेत्रातही काटकसर करणार आहे त्याच्यातून शिक्षण क्षेत्र वगळले जाणार आहे काय, शिक्षणाला प्राथम्यक्रम नंतर बाकी उपक्रम असे धोरण स्वीकारले पाहिजे. शिक्षणासारख्या महत्वाच्या राष्ट्रीय उन्नतीच्या दृष्टीकोनातून या क्षेत्राला वगळण्यात येईल काय? दुसरा प्रश्न असा आहे की, शासनाचे आदेश न पाळणाऱ्या शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करु असे नेहमी शासनाकडून पत्र दिले जाते अशा किती शाळांनी शासनाचे आदेश पाळले नाहीत आणि त्यांचे किती अनुदान कापले आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** शिक्षण विषयक बाबींवरील कोणताही खर्च शासनाने कमी केलेला नाही. किंबहुना, त्याच्यामध्ये वाढच केलेली आहे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आहे हे मान्य आहे. परंतु शिक्षण विषयक बाबींचा विचार करता मग पाचवा वेतन तावडतोब लागू करण्याची बाब असो, त्याच्या फरकाची रक्कम देणे असो, उच्च माध्यमिक प्राध्यापकांना सुधारित वेतनश्रेणी देणे असो, सातव्या इयत्तेच्या शिक्षकांचा प्रश्न असो याबाबत पूरक मागणी सादर केली आहे. किंबहूना, मागील वेळी पुरवण्या मागण्या मंजूर झाल्या त्यावेळी त्या ५४० कोटीच्या होत्या त्या सर्व शिक्षण विषयक होत्या आणि यावेळीही पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत त्या १५० कोटीच्या आहेत. तेव्हा शिक्षणासंबंधामध्ये वेतनेतर अनुदानाची बाब सोडली तर कोणत्याही बाबीसंबंधी संघटनांमार्फत व लोकप्रतिनिधीही या ठिकाणी प्रश्न मांडले आहेत. त्याच्यामध्ये काटकसरीचा अवलंब केलेला नाही. काटकसरीची बाब अनेक खात्याच्या संदर्भातील बाबीपैकी होती त्याची अंमलबजावणी केलेली नाही. किंबहूना, ६ कोटीची तरतूद केलेली असल्यामुळे मा.मुख्यमंत्री यासंबंधी काटकसरीची भूमिका घेतात असे दिसते काय, प्रयोगशाळेतील बाब असो यासाठी लागणारा निधी आपण उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच्यामध्ये काटकसरीचा भाग कोणत्याही स्वरुपामध्ये येत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मा.मंत्री महोदयांनी अगदी ठामपणे सांगितले आहे की, वेतनेतर अनुदान बंद करणार नाही. तशाप्रकारचे कोणतेही आदेश निघालेले आहेत. महाराष्ट्रामध्ये यानिमित्ताने सर्व लोकांना ठाऊक होईल. आता पुरवण्या मागण्या ६ कोटीच्या सादर केल्या आहेत आणि बजेटमध्ये ४२ कोटीची तरतूद केली होती त्यापैकी २१ कोटी दिले आणि हे ६ कोटी रुपये देणार आहे असे सांगितले आहे. मुंबईमध्ये बसून आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नाबाबत जो दृष्टीकोन घेतला आहे तो आपण घेतलेला नाही या बाबत मी आपणास धन्यवाद देतो. आपल्या सचिवांनी तसे सांगितलेले आहे हे पहिल्या उत्तरामध्ये आलेले आहे. मा.मंत्री महोदय म्हणतात ते बरोबर आहे की, या ठिकाणी दिलेली आश्वासने पूर्ण झालेली आहेत. आपण २१ कोटी रुपये दिलेले आहेत आणि २१ कोटी रुपये देणार आहात. ६ कोटी रुपये सप्लीमेंटरी डिमांड झाल्यानंतर देण्यात येणार आहेत. हे झाल्यानंतर ९८-९९ पर्यंतची थकबाकी पूर्ण होते. आपल्याला बॅकलॉग भरुन काढावयाचा आहे. पुढच्या म्हणजे २००३-२००४ च्या वर्षीचे अंदाजपत्रक तयार करताना राहिले त्यातील निदान निम्मा बॅकलॉग तरी पूर्ण होईल असे आपण प्रयत्न कराल काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** नक्की प्रयत्न करीन. या प्रश्नावर जर आणखी प्रश्न उपस्थित होणार नसतील तर मी प्रामाणिकपणे तसे प्रयत्न करीन.

**श्रीमती संजीवनी रायकर :** संस्था चालकांच्या बैठकीमध्ये आणि गोविंद महेश श्रॉफ यांच्या उपस्थितीमध्ये शासनाने कबूल केले होते की, यांना ६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. हे पैसे आपण कोठून आणणार आहात असा मी प्रश्न विचारला होता. त्यावेळी मा.मंत्रि महोदयांनी असे सांगितले होते की, मुख्यमंत्री निधीतून हे पैसे दिले जातील. तसे हे पैसे दिले जाणार आहेत का आणि जे २१ कोटी रुपये दिले गेलेले आहेत त्याचे काय झाले याची माहीती मा.मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी द्यावी.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** वेतनेतर अनुदानासाठी कॉन्टीन्जन्सी फंडातून रक्कम देता येते. मुख्यमंत्री निधीतून अशी रक्कम देता येत नाही हे मला माहीती आहे. त्यामुळे मुख्यमंत्री निधीतून हे पैसे जातील असे मी सांगितलेले नाही. आता २१ कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात अनेक संस्था चालकांच्या थोड्या फार प्रमाणात तक्रारी आहेत की, यासाठी पे यूनीटमध्ये आम्हाला हेलपाटे मारावे लागतात. आपल्या सर्वांना मान्य असेल तर वेतनेत्तर अनुदानाचे चेक संस्था चालकांना बँकेचे कमीशन वजा जाता डिमांड ड्राफ्टने रजिस्ट्रर पोस्टाने पाठविण्याची शासनाची तयारी आहे. जेणेकरुन या सर्व बाबतीत पारदर्शकता येऊ शकेल. यामुळे या, भेटा आणि सुटा असे म्हणण्याची देखील गरज नाही.

**मेजर सुधीर सावंत :** वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्या बाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. जे रात्र शाळेतून ॲडमीशन घेतात. मी या रात्र शाळांना भेट दिली होती. त्यांच्याकडे स्टेशनरी घेण्यासाठी देखील पैसे नाहीत अशी या शाळांची अवस्था आहे. या शाळेतील ९० टक्के विद्यार्थी हे मागासवर्गीय आहेत. या शाळांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या शाळांना खास बाब म्हणून वेतनेतर अनुदान देण्याचा प्रयत्न शासन करील काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** होय.

*****

(१०)

# राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांचे ४ वर्षाचे थकित वेतनेत्तर अनुदान अदा करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, दिनांक २६ मार्च २००३ : दुसरे अधिवेशन, २००३*

(७) * ३०३९० **श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. प.म. पाटील , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक २७२७७ ला दिनांक १८ डिसेंबर,२००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९८-१९९९ ते २००१-२००२ या चार वर्षाचे थकित वेतनेत्तर अनुदानासाठी चालू वर्षी रिॲप्रोप्रिएशन करुन ५० टक्के निधी शिक्षण विभागाकडे वळता करण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय ;

(२) असल्यास, किती निधी उपलब्ध करण्याचे ठरविले आहे ;

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र शिंगणे ,श्री. अमरिश पटेल यांजकरिताः** (१) या प्रयोजनाकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री. व्ही.यु.डायव्हाणे :** सभापती महोदय, राज्यातील माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाबाबतचा हा प्रश्न आहे,राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानांच्या संदर्भात आजच्या परिस्थितीला ३१२ कोटी रुपये गेल्या चार वर्षाचे थकित आहेत. सभापती महोदय, दिनांक १६.१२ आणि दि.१८.१२.२००३ ला असे उत्तर दिले होते की, हे जे देणे आहे त्याच्या ५० टक्के रिॲप्रोप्रिएशनद्वारे किंवा अन्य मार्गाने देण्याचा निश्चित प्रयत्न करु. मा. शिक्षण मंत्र्यांनी त्यावेळेस स्पष्टपणे असे म्हटले होते की, "नक्की प्रयत्न करीन पण या प्रश्नावर जर आणखी प्रश्न उपस्थित होणार नसतील तर मी प्रामाणिकपणे तसे प्रयत्न करील." त्यामुळे आम्ही त्यावर पुन्हा प्रश्न विचारले नाही. मा. मंत्रिमहोदयांनी दि.१८.१२.२००२ ला अशा प्रकारचे उत्तर दिले होते त्यामुळे आम्ही त्यावेळेला पुढे प्रश्न विचारले नाहीत. तो प्रामाणिकपणा सोडा पण त्यांचे आजचे उत्तर असे आहे की, या प्रयोजनाकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध होऊ शकला नाही. आज या शाळांची स्थिती अशी आहे की,लॅब्रॉटरीचे साहित्य घेण्यासाठी पैसे नाहीत. वाचनालयाची पुस्तके घेण्यासाठी पैसे नाहीत.फर्निचर घेण्यासाठी पैसे नाहीत.विजेचे बिल देण्यासाठी पैसे नाहीत. त्यामुळे वीज कनेक्शन तोडलेले आहेत. ५० टक्के शाळातील टेलिफोनचे कनेक्शन तोडलेले आहेत. यासंदर्भात दोन महिन्यापूर्वी शब्द दिला होता तोही पाळलेला नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या वर्षीची ४८ कोटी रुपये तरतूद केली होती त्यापैकी २१ कोटी रुपये वितरीत झाले आहेत. म्हणजे याच वर्षी तरतूद झालेले आणि सभागृहाने मंजूर केलेले २७ कोटी रुपये देणे आहे. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, हे उर्वरित २७ कोटी रुपये ३१ मार्च पूर्वी शाळांना पोहचविण्याची व्यवस्था केली जाईल काय? आणि दुसरा प्रश्न असा की, ३१२ कोटी रुपयापैकी निदान ५० टक्के,शाळा बंद होतील हे लक्षात घेऊन या शाळा चालवावयाच्या असतील तर आणि ग्रामीण भागातील शिक्षण आज थोडया प्रमाणात आहे त्या स्थितीत ठेवावयाचे असेल तर निदान ५० टक्के तरतूद होणे आवश्यक आहे. अन्यथा सारे शैक्षणिक वातावरण कोलमडून पडेल. म्हणून मला याठिकाणी दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. २७ कोटी रुपये बजेट मागच्या वर्षी बजेटमध्ये मंजूर झाले आहे. आणि पुरवणी मागण्यांमध्ये ६ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. असे एकूण २७ कोटी रुपये ३१ मार्च पूर्वी आणि ३१२ कोटी रुपयांपैकी निदान अर्धे पैसे देणार काय याबद्दल स्पष्टपणे सांगावे.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मा. मंत्रिमहोदयांनी याठिकाणी तशा प्रकारचे आश्वासन दिलेले होते हे मी मान्य करतो. याठिकाणी दोन प्रश्न विचारलेले आहेत. मागच्या नागपूर अधिवेशनात आश्वासन दिले होते की, रिॲप्रोपिएशनद्वारे इतर खात्यात बचत झाली असेल तर राज्याचे ३-४ वर्षाचे वेतनेत्तर अनुदान देण्याची ३१२ कोटी रुपये जवळपास आहे. ती जर बचत झाली, सेव्हिंग झाली तर त्यातून वळवून मदत करता येईल. परंतु इतर खात्याची सेव्हिंग न झालयामुळे तो निधी तिकडे वळविता आला नाही. मागच्या वर्षी ४८ कोटी रुपये वेतनेत्तर

(८)

## राज्यातील अनुदानित माध्यमिक/प्राथमिक शाळांच्या थकित वेतनेतर अनुदानाची सद्यःस्थिती

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन, २००२*
*शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर २००२*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २००२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक (५३) २७६९३*

(५३) * २७६९३ **श्री.प.म.पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.जी.एल.ऐनापूरे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे** : ता.प्र.क्र.२५०४० ला दिनांक ३१ जुलै २००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मार्च, २००२ पर्यंतचे देय थकित अनुदान किती आहे;

(२) असल्यास, थकित देय वेतनेतर अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करणार आहे;

(३) नसल्यास, उपरोक्त विषयी शासनाची भूमिका व धोरण काय आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** (१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे दिनांक ३१ मार्च २००२ पर्यंत एकूण देय वेतनेतर अनुदान रुपये २४८.५० कोटी एवढे आहे.

(२) सन २००२-२००३ यावर्षी अशासकीय अनुदानित प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी आतापर्यन्त रुपये ६.०० लक्ष एवढा खर्च झाला असून अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी रुपये २१.०० कोटी रक्कमेचे वाटप सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

(९)

## राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : दुसरे अधिवेशन, २००३*
*बुधवार, दिनांक १२ मार्च २००३*

(२७) * ३०४१६ **प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.ऐनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक २७२७७ ला दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेतनेतर अनुदान अदा करण्याची सद्यःस्थिती काय आहे;

(२) या वर्षात एकूण किती वेतनेतर अनुदान अदा करण्यात आलेले आहे;

(३) उर्वरित वेतनेत्तर अनुदान अदा करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे;

(४) त्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे?

**श्री.अमरिश पटेल :** (१) व (२) खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी चालू आर्थिक वर्षाकरिता एकूण रुपये ९ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद वितरित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना १९९८-९९ पर्यंतचे वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी रुपये ४८८०.२१ लक्ष मंजूर तरतूदींपैकी रुपये २१४०.०० लक्ष एवढ्या तरतूदीचे वाटप करण्यात आलेले असून उर्वरित तरतुदीचे वाटप करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी एकूण रुपये १२.२१ कोटी व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी रुपये ३१२.४९ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार वेतनेत्तर अनुदान देण्याचा विचार करण्यात येईल.

*****

अनुदानासंबंधी १९९८-९९ मध्ये पूर्ण करावयाची होती. त्यामधील २१ कोटी रुपये दिलेले आहेत. ६ कोटी रुपयाची पुरवणी मागणी हिवाळी अधिवेशनाम मंजूर झालेली आहे. म्हणजे २१अधिक ६ एकूण २७ कोटी रुपये मार्च पर्यंत देण्याचे सांगितले होते. त्याप्रमाणे ते देण्याचा पूर्णपणे प्रयत्न करीत आहोत.

**श्री. व्हि. यु. डायगव्हाणे :** सभापती महोदय, चार दिवसानंतर हे वर्षे संपणार आहे तरी प्रयत्न करणार. ३१ मार्चच्या रात्री १२.०० वाजण्यापूर्वी कारण ३१ मार्चच्या रात्री १२.०० नंतर ट्रेझरीमध्ये बिल घेत नाहीत. २७ कोटी रुपये ३१ मार्च पूर्वी वितरित होतील काय. नंतर देईल असे म्हटले तर चार महिने आणि सहा महिने निघून जातील एक अधिवेशन संपूण जाईल आणि ते पैसे मिळणार नाहीत. यापैकी किमान ५० टक्के पैसे ३१ मार्च पूर्वी देतो एवढे तरी म्हणा. सभापती महोदय, माझ्या दोन्ही प्रश्नाचे उत्तर याठिकाणी आलेले नाही.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, राहिलेले २७ कोटी रुपये देण्याबद्दल सभागृहात आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे पूर्णपणे प्रयत्न सातत्याने चालू आहेत. ३१ मार्च पर्यंत ही रक्कम दिली जाईल यासाठी सातत्याने मी स्वतः प्रयत्न करीत आहे.शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्यासाठी वित्त विभागाशी संपर्क साधीत आहोत.उर्वरित २७ रुपयापैकी जास्तीत जास्त रक्कम देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, या सभागृहाने बजेटेड करुन दिलेली ती रक्कम आहे.

**श्री. धोंडीराम राठोड :** सभापती महोदय, प्रयत्न करु, प्रयत्न करु असे मा. मंत्रिमहोदयांचे उत्तर ऐकून आमचे कान बहिरे झालेले आहेत. ३१ मार्चपूर्वी हे पैसे आपण देणार आहात काय ? ते द्यावे लागणार आहेत. कारण शाळा बंद होण्याच्या स्थितीमध्ये आहेत. सगळया शाळांमध्ये खडू घेण्यासाठी सुध्दा पैसे राहिलेले नाहीत. फर्निचर नाही. ग्रंथालयात पुस्तके नाहीत. प्रयोगशाळेसाठी साहित्य नाही. यामध्ये दुसराच डाव दिसतो. शाळा तपासणीच्या वेळी तुमच्याकडे फर्निचर नाही, तुमच्याकडे साहित्य नाही, तुमच्या प्रयोगशाळेत साहित्य नाही, तुमच्या वाचनालयात पुस्तके नाहीत, तुम्ही शाळा व्यवस्थित चालवू शकत नाही अशा प्रकारचा ठपका ठेवण्याचा डाव यामध्ये दिसतो. या सगळया ग्रामीण भागातील शाळा आपल्याला बंद करावयाच्या आहेत काय ? नसेल तर ३१ मार्चपर्यन्त हे पैसे द्यावेत.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** हा प्रश्न वेतनेतर अनुदानाचा आहे. राज्य शासनाने आतापर्यन्त प्रथम प्राधान्य वेतनासाठी दिलेले आहे. मागच्या एक वर्षामध्ये संपूर्ण राज्यामधून शिक्षकाचे वेतन दिलेले नाही असा एकही प्रश्न किंवा तक्रार शासनाकडे आलेली नाही. प्रथम प्राधान्य हे वेतनासाठी दिलेले आहे. वेतनेतर अनुदान हे नेहमीच निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. २७ कोटी रुपये देण्याचा जो प्रश्न आहे त्याबाबतीत ३१ मार्चपर्यन्त जास्तीत जास्त रक्कम देण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**श्री. बी.टी.देशमुख :** आपण बजेट प्रोव्हीजन केलेली आहे. २१ कोटी अधिक ६ कोटी अशी एकूण २७ कोटीची बजेट प्रोव्हीजन करुन दिलेली आहे ती ३१ मार्चपर्यन्त वाटप करण्याचा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील शाळांचा द्वेष करणारी मंडळी त्या ठिकाणी मंत्रालयात बसलेली आहेत. त्यांनी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवला होता की वेतनेतर अनुदान बंद करावे. मंत्रिमंडळाचा निर्णयही झाला होता. याच प्रश्नाच्या उत्तरात मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, मंत्रिमंडळाचा निर्णय झाला होता परंतु जी.आर.काढला नाही. तेच अधिकारी पुन्हा खेळ करीत आहेत. माझे असे म्हणणे आहे की, जो निधी मंजूर व्हावयाचा आहे त्याच्या बाबतीत पुढे पाहू परंतु जो निधी मंजूर झालेला आहे त्याबाबतचा प्रश्न आहे. नाही तर मग आम्ही निषेध करुन बहिर्गमन करु. पुरवणी मागण्यांद्वारे ६ कोटी आणि बजेटमध्ये २१ कोटी रुपये असे एकूण २७ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. हा निधी म्हणजे अत्यंत अल्प आहे त्याने काही भागणार नाही. हा एकूण ३१२ कोटीचा प्रश्न आहे. आपण २७ कोटी रुपये ३१ मार्चपर्यन्त देण्याच्या बाबतीत सांगावे. २१ कोटी आणि ६ कोटी अशी २७ कोटीची जी बजेट प्रोव्हीजन करुन दिली ती ३१ मार्चपर्यन्त त्या त्या लोकांना दिली पाहिजे. ट्रेझरीतून ते मिळाले पाहिजे. मध्ये झारीतील शुक्राचार्य बसणार नाहीत याची काळजी आपण घेणार आहात काय ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुखसरांनी या ठिकाणी सांगितले की, बिलाची अडचण येऊ नये. म्हणून मी या सभागृहात आश्वासन देऊ इच्छित नाही. परंतु माझा पूर्ण प्रयत्न आहे. जे आश्वासन दिलेले आहे ते पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आम्ही याबाबत निषेध व्यक्त करुन सभात्याग करतो.

( काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

*****

## (११)

## अमरावती महसूल विभागातील अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी महाविद्यालयासाठी सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी वेतनेत्तर अनुदान अदा करणे

***महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००३***

*गुरुवार, दिनांक १० एप्रिल २००३*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले लक्षवेधी सूचनेवरील निवेदन*

**सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरे,** विधान परिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"अमरावती महसूल विभागातील अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी महाविद्यालयासाठी सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी १ कोटी १३ लक्ष रुपये इतकी वेतनेत्तर अनुदानासाठी तरतूद करण्याचा प्रस्ताव सादर केल्याचे शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांनी दिनांक २ डिसेंबर २००२ च्या पत्रान्वये सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती यांना कळविणे, २००२-२००३ हे वर्ष संपत आले तरी याबाबत पुढे कोणतीही कारवाई न होणे, गेल्या ३-४ वर्षापासून वेतनेत्तर अनुदान उक्त महाविद्यालयांना वितरित न झाल्यामुळे एकूणच शिक्षण व्यवस्थेवर झालेला विपरित परिणाम, पुढील ५-६ दिवसांमध्ये हे अनुदान अदा न झाल्यास ते व्यपगत होण्याची निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

### मा.मंत्री, उच्च शिक्षण यांचे निवेदन

अमरावती महसूल विभागात ५ जिल्हे असून या ५ जिल्ह्यांमध्ये खालीलप्रमाणे १०७ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र वरिष्ठ महाविद्यालये आहेत.

| जिल्हा | संख्या |
|---|---|
| अमरावती | ४१ |
| बुलढाणा | १८ |
| वाशिम | ११ |
| अकोला | १४ |
| यवतमाळ | २३ |
| एकूण | १०७ |

शासन निर्णय, दिनांक ३.१०.७९ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुज्ञेय बाबीवर वेतनेतर अनुदान देण्यात येते.

सन २००२-२००३ या वर्षात राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी वेतनेतर अनुदानासाठी उपलब्ध असलेल्या एकूण रु.१३६३.१६ लाख एवढ्या तरतुदीपैकी **अमरावती विभागासाठी रु.१६१.०० लाख एवढी तरतूद संचालक, उच्च शिक्षण यांनी सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांना अदा करण्यासाठी ठेवली होती.** संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक २.१२.२००२ च्या पत्रान्वये ही रक्कम महाविद्यालय निहाय वाटप करण्यासाठी किती तरतूद प्रत्येक महाविद्यालयासाठी ठेवावी, याबाबतची माहिती सहसंचालककाकडून मागविली होती. **तथापि, ही रक्कम अद्याप अंतिमरित्या वितरित करण्यात आलेली नाही.**

अमरावती विभागात सन १९९८-९९ ते सन २००१-२००२ पर्यंत देण्यात आलेली वेतनेतर अनुदानाबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहेः-

| अ.क्र. | वर्ष | वेतनेतर अनुदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | १९९८-९९ | रु.५५,२५,०००/- |
| २ | १९९९-२००० | रु.१,११,८५,०००/- |
| ३ | २०००-२००१ | रु.१,२०,००,०००/- |
| ४ | २००१-२००२ | रु.१,००,००,०००/- |

उपरोक्त माहिती पाहता हे स्पष्ट होते की, अमरावती विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांना गेल्या २- ३ वर्षापासून वेतनेतर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्यात आलेले आहे.

राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन वरिष्ठ महाविद्यालयांना देय असलेले वेतनेतर अनुदान व थकबाकी टप्प्याटप्प्याने देता येईल किंवा कसे, ही बाब तपासून पाहण्यात येत आहे.

*****

(१४)

# विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती अमरावती व नागपूर विभाग यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिलेले निवेदन

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २००३ : चौथे अधिवेशन २००३*

**सर्वश्री बी.टी. देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मोडक , श्रीमती संजीवनी रायकर, श्री. श्रीकांत जोशी** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

**श्री.लक्ष्मणराव ढोबळे (उच्च शिक्षण मंत्री)** : अध्यक्ष महोदय, सर्वश्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. श्रीकांत जोशी यांनी "विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आदोलन कृती समिती अमरावती व नागपूर विभाग यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिलेले निवेदन" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नियम ९३ ची सूचना**

ज्याअर्थी "विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती अमरावती व नागपूर विभाग" या संघटनेच्या अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी एक निवेदन मा. मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत सादर करुन दिनांक ८ डिसेंबर रोजी शाळा, महाविद्यालये बंद आंदोलन, परीक्षेसाठी शाळा महाविद्यालयाच्या इमारती उपलब्ध न करण्याचे आंदोलन, याबाबत नोटीस दिलेली आहे. आणि;

ज्याअर्थी या आंदोलनाच्या परिणामी ८ डिसेंबर २००३ रोजी होणाऱ्या अमरावती विद्यापीठाच्या पूरवणी परिक्षांचा सर्व कार्यक्रम पुढे ढकलावा लागला आणि;

ज्याअर्थी अमरावती विद्यापीठात मागास वर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्यमंत्री यांनी कबुल करुन सुद्धा त्याबाबत काहीच कारवाई झाली नाही अशी तक्रार आंदोलन कर्त्यांनी केली आहे, तशीच विनंती त्या विद्यापीठाच्या मा. कुलगुरुंनी सुद्धा मा. मुख्यमंत्र्यांना २६ सप्टेंबर व १० सप्टेबर २००३ रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे, आणि;

ज्याअर्थी अनेक वर्षांचे वेतनेत्तर अनुदान न मिळाल्यामुळे विजेची व टेलिफोनची बिले थकली आहेत, कराचा भरणा न केल्यामुळे अनेक महाविद्यालयांना जप्तीच्या नोटीसा प्राप्त झाल्या आहेत, प्रयोग शाळा साहित्याचा तुटवडा पडल्याने त्याचा शैक्षणिक दर्जावर परिणाम झाला आहे, प्राचार्य फोरम, अमरावती विद्यापीठ अमरावती, यांनी २२.४.२००३ रोजी किंवा त्या दरम्यान, मा. उच्च शिक्षणमंत्री यांना, सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून ह्या बाबी लक्षात आणून दिल्या आहेत. आणि;

**ज्याअर्थी ५.८.२००२ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या विधानभवनातील दालनात गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाशी चर्चा झाली, त्या चर्चेत काही निर्णय झाले, मा. गोविंदभाईनी ८.८.२००२ च्या पत्रान्वये हे निर्णय मा.मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिले,** दिलेला शब्द पाळला जात नसल्याची ४.९.२००२ च्या पत्रान्वये त्यांनी तक्रार केली आणि आता वेतनेत्तर अनुदान देण्याचे तर बाजूलाच राहिले, उलट ते अनुदान तीप्पटीने कमी करण्याचा उच्च शिक्षण विभागाचा २३.९.२००३ चा शासननिर्णय निर्गमित झाला आणि तो शासननिर्णय तातडीने रद्द करण्याची व सर्व स्तरावरील थकित वेतनेत्तर अनुदान तावडतोब अदा करण्याची मागणी आंदोलन कर्त्यांतर्फे करण्यात आली आहे, आणि;

ज्याअर्थी वेतनेत्तर अनुदानाच्या थकितीमुळे जनमानसामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे,

त्याअर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे."

**मा. मंत्री उच्च शिक्षण यांचे निवेदन**

१. विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती, अमरावती व नागपूर विभाग या संघटनेच्यावतीने मा. मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत दिनांक २१.११.२००३

(१२)

## राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांचे १९९८-१९९९ चे थकित वेतनेतर अनुदान रुपये २७ कोटी वितरित करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००३*

*गुरुवार, दिनांक २४ जुलै २००३*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या पाचव्या यादीतील अतारांकित प्र.क्र.३०३३४*

**(१) ३०३३४ (९-४-२००३). श्री.वसंतराव खोटरे, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.ऐनापूरे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९८-९९ पर्यंत देय असलेले थकित वेतनेतर अनुदान रुपये २७ कोटी या महिनाअखेर पर्यंत उपलब्ध करून देण्याच्या विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय;

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) अद्यापही निर्णय झालेला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.अमरीशभाई पटेल** (१८-६-२००३) : (१) होय.

(२) सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात अशासकीय अनुदान माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी एकूण रुपये २७८१.२१ लक्ष एवढी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

*****

(१३)

## शाळांचे वेतनेत्तर अनुदान ३ ते ६ वर्षापासून थकीत असल्याबाबत

***महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३***

***बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २००३***

**(२५) * ३७२७२ श्री. धोंडीराम राठोड , श्री. प.म. पाटील, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. ऐनापूरे, श्री. सुरेश भालेराव, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. श्रीकांत जोशी** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे शाळांचे वेतनेत्तर अनुदान (Non Salary Grant) ३ ते ६ वर्षापासून थकीत आहे खरे आहे काय ;

(२) असल्यास, पश्चिम महाराष्ट्रात सन २००० पर्यन्त शाळांचे वेतनेत्तर अनुदान देण्यात आले हेही खरे आहे काय ;

(३) ३ ते ६ वर्षापासून थकीत वेतनेत्तर अनुदान (Non Salary Grant) शाळेला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अनुदान देण्याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.अमरीशभाई पटेल** : (१) वेतनेतर अनुदानासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे वेतनेतर अनुदान थकीत आहे हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) वेतनेतर अनुदानाच्या थकीत प्रदानासाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

******

रोजी एक निवेदन दिले असून दिनांक ८.१२.२००३ रोजी शाळा, महाविद्यालये बंद आंदोलन करण्याची सूचना दिली आहे.

२. विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती, अमरावती व नागपूर विभाग यांनी दिलेले निवेदन प्राप्त झाल्यानंतर दि. ८.१२.२००३ रोजी होणारा बंद लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अमरावती विद्यापीठाने त्या दिवशी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दि. ८.१२.२००३ रोजी होणाऱ्या परीक्षा दि. २३.१२.२००३ रोजी होणार आहेत. दि. ९.१२.२००३ पासून नियमित वेळापत्रकानुसार परीक्षा सुरु आहेत.

३. अमरावती विद्यापीठात मागासवर्गीय कक्ष स्थापन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली असून आयोगाने मंजूर केलेल्या पाच पदांच्या वेतनाची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावयाची आहे. मागासवर्गीय कक्ष स्थापन करण्याच्या प्रस्तावास मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक ६.६.२००३ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त जुलै २००३ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनातील पूरक मागण्यांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्राप्त झाल्यामुळे त्या अधिवेशनात ही बाब विधिमंडळाच्या नजरेस आणता आली नाही. आता ही बाब विधानमंडळाच्या निदर्शनास आणण्यासाठी २००३ च्या हिवाळी अधिवेशनात म्हणजेच चालू अधिवेशनात लाक्षणिक पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. **ही पूरक मागणी विधानमंडळाने मान्य केल्यानंतर हा कक्ष स्थापन करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.**

४. शासन निर्णय दि. ३.१०.१९७९ नुसार राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुज्ञेय बाबींवर वेतनेत्तर अनुदान देण्यात येते. त्यानुसार अमरावती व नागपूर विभागात सन ९८-९९ ते २००१-२००२ पर्यंत देण्यात आलेली वेतनेत्तर अनुदानाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न. वर्ष | दिलेली वेतनेत्तर अनुदानाची रक्कम (रुपये लाखात) | |
|---|---|---|
| | नागपूर | अमरावती |
| १. १९९८-९९ | ८८ | ५६ |
| २. १९९९-२००० | २५९ | ११२ |
| ३. २०००-२००१ | १५२ | १०० |
| ४. २००१-२००२ | १३९ | १०० |

५. उपरोक्त माहिती पाहता हे स्पष्ट होते की, अमरावती व नागपूर विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांना सन २००१-२००२ पर्यंत वेतनेत्तर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्यात आलेले आहे.

६. सन २००२-२००३ या वर्षात राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत अशासकीय अनुदानित कला वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी वेतनेत्तर अनुदानासाठी १३६३.१६ लाख एवढी तरतूद उपलब्ध होती. त्यापैकी अमरावती विभागांसाठी रु. १६१ लाख तरतुद उपलब्ध होती. राज्यातील कोणत्याही वरिष्ठ महाविद्यालयासाठी सन २००२-२००३ या वर्षात वेतनेत्तर अनुदानासाठी निधी वितरित करण्यात आला नाही.

७. शासन निर्णय दि. ३.१०.१९७९ नुसार निश्चित केलेले दर कालबाह्य झाल्याने व मधल्या कालावधीत चवथा वेतन आयोग व पाचवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनात जवळपास दहा पटीने वाढ झाल्याने वेतन अनुदानातही वाढ झालेली आहे. त्यामुळे वेतनेत्तर अनुदानासाठी देय होणाऱ्या वेतन खर्चाच्या टक्केवारीत कपात करणे आवश्यक होते. त्यानुसार शासन निर्णय दि. २३.९.२००३ नुसार वेतनेत्तर अनुदान अनुज्ञेय वेतन अनुदानाच्या ५ टक्के करण्यात आले आहे.

८. दिनांक २३.९.२००३ रोजी सुधारित करण्यात आलेल्या वेतनेत्तर अनुदानाच्या दरानुसार सन २००३-०४ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील १०० टक्के अनुदानित अशासकिय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयांसाठी आवश्यक असणारी रु. ३,३१,९०,००,००- एवढ्या रकमेची तरतूद अष्टमासिक अंदाजपत्रकात उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

९. अमरावती विद्यापीठात मागासवर्गीय कक्ष स्थापन करण्याबाबत व सन २००३-०४ या वर्षासाठी महाविद्यालयांना देय असलेले वेतनेत्तर अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. त्यामुळे या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे असे म्हणता येणार नाही.

**श्री. बी.टी.देशमुख :** मंत्रिमहोदयांनी निवेदन वितरित केलेले आहे. परंतु येथे देखील विपरित परिस्थिती निर्माण झालेली आहे. या क्षेत्रामध्ये काम करणारे ज्येष्ठ नेते व्यवस्थापन मंडळ संघटनेचे अध्यक्ष श्री. गोविंदभाई श्रॉफ यांची मा.मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली. त्या बैठकीमध्ये जे निर्णय झाले, ते निर्णय काय आहेत ? ५.८.२००२ रोजी बैठक झाली आणि ८.८.२००२ला श्री. गोविंदभाई श्रॉफ यांनी मा.मुख्यमंत्र्यांना पत्र देवून ती बाब कळविली. बैठकीमध्ये जे निर्णय झाले त्यामधील पहिला निर्णय असा आहे की , "At the outset the Hon'ble Chief Minister unequivocally stated that non-salary grant, being a committed expenditure, shall have to be paid in full." परिच्छेद क्रमांक ३मध्ये असे म्हटलेले आहे की, "As regards senior colleges, it was agreed that non-salary grant due up to 2001 will be paid at the earliest during the year 2002".परिच्छेद क्रमांक ५मध्ये असे म्हटलेले आहे की, "It was also agreed that remaining outstanding dues of non-salary grant up to year 2003, both of schools and colleges, would be provided for in the Budget for the year 2003-2004." माझा प्रश्न असा आहे की, मा. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत हे निर्णय त्या दिवशी झाले होते की नाही ?

श्री. लक्ष्मणराव ढोबळे : होय.

श्री. बी.टी.देशमुख : मी मंत्रिमहोदयांचा आभारी आहे. या बद्दल की, मी विचारलेल्या प्रश्नासंबंधी निवेदनात एकही शब्द नसला तरी त्यांनी माहिती घेतलेली आहे. निर्णय घेतलेले असल्याचे मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. खरे म्हणजे हे निवेदनात यायला पाहिजे होते. माझे म्हणणे असे आहे की, या क्षेत्रातील लोकांशी आपण कधी चर्चा करीत नाही पण त्यादिवशी ती केली आणि निर्णय घेतलेत. हे निर्णय रेकॉर्डवर आहेत, पण द्यायचे बाजूलाच राहिले. उलट शासनाने १८ ऐवजी ५टक्के वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी जी.आर. काढला. १९८० साली एकूण खर्चाच्या १८ टक्के वेतनेतर अनुदान होते. आता १० पटीने किंमती वाढलेल्या असताना १८ च्या ऐवजी वेतन खर्चाच्या ५ टक्के वेतनेतर अनुदान आपण देणार ?

*अकृषि विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत*

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय, क्रमांक एनजीसी २००३/(३५४/०३)/मशि-३.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
**दिनांक : १६ फेब्रुवारी, २००४**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, शिक्षण सेवायोजन आणि युवक सेवा विभाग, क्रमांक एनजीसी १२७९/१५७७९६-XXV,दिनांक ३.१०.१९७९.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक बीयूसी १०८८/२०२९/मशि-३, दिनांक १०.१.१९९६
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक एनजीसी २००३/(३५३/०३)/मशि-३, दिनांक २३ सप्टेंबर, २००३

**शासन निर्णय :** अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये या महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनाकडून महाविद्यालयाला जे वेतन अनुदान दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के इतका निधी वेतनेत्तर अनुदान म्हणून देण्याबाबतचे आदेश शासनाने काढले आहेत. हे अनुदान कशा पद्धतीने द्यावे, याबाबतची कार्यपद्धती खालीलप्रमाणे ठरवून देण्यात येत आहे. :-

अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रत्येक वर्षी जमा झालेल्या शुल्काचे समायोजन करताना मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगानुसार मान्य असलेल्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के एवढी रक्कम वेतनेत्तर खर्चासाठी समाविष्ट करुन समायोजन करावे. अंतिम समायोजनाच्या वेळी वेतन अनुदानात त्रुटी आढळून आल्यास संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडे संबंधित विभागीय सहसंचालकांमार्फत संपर्क साधावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अ.मा.भट्टलवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

माझा प्रश्न असा आहे की, हे वेतनेतर अनुदान ६५ ते ७५ टक्के कमी करणारा शासन निर्णय ताबडतोबीने रद्द करण्यात येईल काय ?

श्री. लक्ष्मणराव ढोबळे : २००० सालापासून सातत्याने १२ टक्के, १८ टक्के देण्यासंबंधीचे निर्णय हे आधीचे आहेत. तिस-या वेतन आयोगा प्रमाणे निर्णय पुढे चालू ठेवावा आणि ५व्या वेतन आयोगाच्या वेळी १२टक्के, १८ टक्के ही व्यवस्था चालू ठेवावी अशा प्रकारची मागणी संघटनेकडून सातत्याने होत होती आणि मा.मुख्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीतही ही मागणी करण्यात आली. या सर्व मागण्यांचा आढावा घेता कमीत कमी ६०० कोटी रुपये लागतील आणि हे पैसे देणे शासनाला शक्य होणार नाही अशा प्रकारची भूमिका मांडण्यात आली. त्यावेळी तिस-या वेतन आयोगाप्रमाणे जे आपण देत होतो त्याच पध्दतीने न देता आता वाढलेल्या ५व्या वेतन आयोगाप्रमाणे हे पैसे द्यावयाचे झाले तर ही रक्कम फार वाढेल. ही रक्कम फार वाढणार आहे. त्यापेक्षा आपण पाचव्या वेतन आयोगाच्या मिळणा-या पगाराच्या ५ टक्के वेतन द्यावे, त्यासाठी ४० कोटीची तरतूद करावी अशाप्रकारचा विषय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी आला. तो मान्यतेसाठी आल्यानंतर आपल्याला त्यापध्दतीने देखील जे ५ टक्के पैसे आपल्याला पाहिजे होते ते पैसे मिळू शकले नाहीत. त्याला अर्थ विभागाने जी मान्यता द्यावयास पाहिजे होती ती मिळाली नाही. परंतु आता आठमाही मान्यता घेण्याबद्दलचा विषय राहिल त्यावेळेला ही वाढीव तरतूद करुन आम्ही आपल्याला हे पैसे देणार आहोत अशाप्रकारची शासनाची भूमिका आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मा. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली मा. मुख्यमंत्र्यांशी जी बैठक झाली त्याचे कार्यवृत्त मी आपल्याला वाचून दाखविले. तुम्ही आता म्हणता तसे त्यात काही नाही. अनुदानात कपात करा, असे त्या कार्यवृत्तामध्ये असेल तर ते वाचून दाखवा. गोविंदभाई श्रॉफ यांच्या मा. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या बैठकीमध्ये अनुदान १८ टक्क्यावरुन ५ टक्क्यावर आणा असे कार्यवृत्तात आहे असे जर आपले म्हणणे असेल तर ते वाचून दाखवा.

श्री.लक्ष्मणराव ढोबळे : तसे नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : मी काय आहे हे सांगितले. राज्याचे मा.मुख्यमंत्री कबूल करतात. I quote, "It was also agreed that remaining outstanding dues of non-salary grant up to year 2003, both of schools and colleges, would be provided for in the Budget for the year 2003-2004." आता हे ज्याने केले नाही त्या अधिका-याला जबाबदार धरा आणि त्यांच्यावर कारवाई करा. **आता मी प्रश्न विचारतो की, जेव्हा मंत्रिमंडळासमोर हा अत्यंत नादानीचा प्रस्ताव ठेवण्यात आला त्यावेळेला आपल्या मुख्यमंत्र्यांनी मा. गोविंदभाई श्राफ यांच्या शिष्टमंडळाला काय कबूल केलेले आहे. हे मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आले होते काय ?**

**श्री.लक्ष्मणराव ढोबळे : होय.**

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, केवढी दुर्दैवाची गोष्ट आहे. केवळ दुर्दैवाचीच नाही तर सभापती महोदय, ही लाजीरवाणी गोष्ट आहे. राज्याचे मा. मुख्यमंत्री गोविंदभाई श्रॉफ, यांना, व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षांना, असे लिहून देतात की, आम्ही आहे या शासन निर्णयाप्रमाणे पूर्ण प्रोव्हीजन २००३-२००४ ला करु. ते केले जात नाही आणि १८ टक्क्यावरुन सायन्स कॉलेजच्या शिक्षणाचे वेतनेत्तर अनुदान ५ टक्क्यावर आणले जाते.याबद्दल जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे. मी पुन्हा मंत्रीमहोदयांना असे विचारु इच्छितो आणि याच्यानंतर मग पुन्हा विचारीत नाही. तुमच्या मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतल्यानंतर जर द्यावयाचे ते देत नसाल आणि १८ टक्क्याचे ५ टक्क्यावर आणण्याचा शासन निर्णय करीत असेल तर ही महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेला अत्यंत लाजीरवाणी अशाप्रकारची गोष्ट आहे. तुमच्यावर कोण विश्वास ठेवील? तेव्हा हा निर्णय ताबडतोब रद्द करुन याचा पुनर्विचार करणार कां ? जरी गोविंदभाई श्रॉफ आज आपल्यात नसले तरी त्यांनी शिक्षण व्यवस्थेसाठी दिलेली ती लढाई आहे. जी व्यवस्थापन मंडळाची मंडळी आहेत त्याच्याशी बोला, बाकीच्या संघटनाशी बोला. आपण याचा पुनर्विचार कराल कां ?

**श्री.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, मा.मुख्यमत्री महोदयांनी गोंविदभाई श्रॉफ यांच्या आदरापोटी त्याठिकाणी झालेल्या चर्चेला 'होय' असे उत्तर दिले.** त्यानंतर ज्या वेळेला कॅबिनेट पुढे हा विषय आला आणि यासाठी लागणारी जी रक्कम आहे त्याचा ज्यावेळेला विचार मंत्रिमंडळाच्या समोर आला त्यावेळेला तिस-या वेतन आयोगामध्ये आपण जेवढे पैसे देत होतो तेवढे नॉन सॅलरीचे पैसे पाचव्या वेतन आयोगाच्या निमित्ताने देणे शासनाला शक्य नाही. त्या ऐवजी सध्याच्या परिस्थितीमध्ये आपण ५ टक्क्याने पैसे देऊ या. त्यासाठी लागणारे ४० कोटी रुपये आपण मंजूर करु या अशाप्रकारचा मंत्रिमंडळाचा निर्णय झाला. त्याप्रमाणे विभागाने तशाप्रकारची फाईल मुव्ह केली आणि ती फाईल अर्थ विभागात गेली असताना ती ४० कोटीची तरतूद देखील आपल्याला पूर्णपणाने करता आली नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : आपण कशाचे कौतुक सांगत आहांत? गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाशी जे ठरले ते तुम्ही कापून काढले. तुम्ही १८ टक्क्यावरुन ५ टक्के केले त्याचे कौतुक करता? मा. ढोबळेसाहेब ग्रामीण भागातील महाविद्यालयातील शिक्षणाची व्यवस्था तुम्हाला जेवढी माहित आहे तेवढी त्या फायनान्सला माहित नाही. आपण जरा विचार करा. निदान याचा पुनर्विचार करा. आपण अत्यंत अयोग्य असे पाऊल उचलेले आहे.

**श्री.लक्ष्मणराव ढोबळे** : ५ टक्क्याने जे पैसे देय आहेत ते निश्चितपणाने देण्यात येतील.

**प्रा.बी.टी.देशमुख : आपण शासन निर्णय रद्द करण्याचा पुनर्विचार कराल काय ?**

**श्री.लक्ष्मणराव ढोबळे : पुनर्विचार करता येणे शक्य नाही.**

**प्रा.बी.टी.देशमुख** : आम्ही शासनाच्या या धोरणाचा निषेध  करतो

**उप सभापती** : यानंतर नियम ९३ अन्वये सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी दिलेल्या सूचनेच्या संदर्भातील सहावे निवेदन आहे.

**श्री.राजेंद्र शिंगणे** :सभापती महोदय, मा. सभापतींकडून यासंदर्भात पत्र आले होते. हे निवेदन पुढे ढकलण्यात आले आहे असे मला सांगण्यात आले आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : पुढे ढकललेले निवेदन सोमवारी घेण्यात यावे.

******

# श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या कुशल नेतृत्त्वाची शेवटची प्रभावी झलक

"७.८.२००२ रोजी मुख्यमंत्री, दोन्ही शिक्षणमंत्री, शासकीय सनदी उच्च अधिकारी आणि अन्य अधिकारी यांच्या समवेत विधान भवनात झालेली चर्चा ही भाईंच्या कुशल नेतृत्त्वाची शेवटची प्रभावी झलक होती. सखोल अध्ययन, अगाध स्मरणशक्ती, सातत्य, आणि समर्पण वृत्तीमुळे प्रश्नांची मांडणी भाई रेखीवपणे करीत असत. मंत्रीमहोदयांनी वा अधिकारी वर्गाने दिलेली माहिती वा आकडेवारी चुकीची आहे हे स्पष्टपणे सांगण्याचे नैतिक अधिष्ठान भाईंच्या नेतृत्त्वात होते. भाईंच्या प्रभावामुळे शिक्षण संस्थांचे बरेच प्रश्न सुकरतेने सुटले गेले. मुक्त अर्थव्यवस्था, जागतिकीकरण आणि न्यायालयीन निर्णय यामुळे शिक्षण संस्थासमोर विविध अडचणीचे डोंगर उभे असताना भाईंचे निधन व्हावे आणि महामंडळ पोरके व्हावे हा दुर्दैवाचा भाग आहे. भाईंच्या निधनामुळे महामंडळ तर नेतृत्वहीन झालेले आहेच, शिवाय महाराष्ट्राच्या शिक्षण आणि समाजकारणातील एका उदात्त विचाराची समाप्ती झालेली असून ही उणीव कधीही भरून निघणारी नाही." - **डॉ.प.भ.कुळकर्णी**

*''शिक्षण साधना'' या मुखपत्रातील डॉ.प.भ.कुळकर्णी यांच्या "नैतिक अधिष्ठान लाभलेले भाईंचे नेतृत्व" या लेखातून उपरोक्त उतारा घेतला आहे.*

(१७)

# राज्यातील खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे थकित वेतनेतर अनुदान मंजूर न करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २००३ : चौथे अधिवेशन २००३*

**सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेन्द्र अैनापुरे,नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर व श्री. श्रीकांत जोशी** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

**श्री. अमरीशभाई पटेल (शालेय शिक्षण मंत्री) :** सभापती महोदय, सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे,बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेन्द्र ऐनापुरे,नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर व श्री. श्रीकांत जोशी यांनी "'राज्यातील खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे थकित वेतनेतर अनुदान मंजूर न करणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होंती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**सूचना**

"ज्याअर्थी राज्यातील सुमारे १०,२१८ खाजगी माध्यमिक शाळा व ३००२ कनिष्ठ महाविद्यालयाचे सन १९९९ ते मार्च २००३ या चार वर्षाचे थकित वेतनेत्तर अनुदान अनुक्रमे रुपये ३६९२४.२४ लक्ष व ३४२.२२ लक्ष शासनाने मंजूर केलेले नाही आणि;

ज्याअर्थी, ५ ऑगस्ट, २००२ रोजी विधानभवन, मुंबई येथील मा. मुख्यमंत्र्याचे दालनात मा. स्व. गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळासोबत झालेल्या बैठकीत उर्वरीत थकीत वेतनेत्तर अनुदानासाठी एक कालबद्ध योजना तयार करुन दरवर्षी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे, आणि;

ज्याअर्थी, या महामंडळाच्या प्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै २००३ ला मुंबई येथे केलेले लाक्षणिक उपोषण, त्याच अनुषंगाने काही प्रतिनिधींना पोलीस विभागाने अटक केली, आणि;

ज्याअर्थी, विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघाने मा. मुख्यमंत्र्यांना दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ रोजी किंवा त्या दरम्यान एक निवेदन देऊन दिनांक ८ डिसेंबर २००३ ला विदर्भ विभागातील सर्व शाळा संस्था बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, आणि;

ज्याअर्थी माध्यमिक उच्च माध्यमिकच्या शालांत परीक्षेला संस्थेची इमारत न देण्याचा निर्णय घेतला आहे, आणि;

ज्याअर्थी इमारत किराया न देणे, विद्युत, दुरध्वनी पुरवठा खंडीत होणे, शैक्षणिक साहित्य शाळांना उपलब्ध करता न येणे, खर्च भागविण्यासाठी नियमबाह्यपणे शिक्षकांच्या वेतनातून काही संस्था चालकांकडून वसूली होणे, इत्यादी कारणाने विद्यार्थ्यांच्या शेक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे, आणि;

ज्याअर्थी संस्थाचालक व संस्था प्रमुख शाळा/संस्था चालविण्यास असमर्थ झाले असल्याने त्यांच्यात चिंतेचे व नैराश्येचे वातावरण पसरलेले आहे,

त्याअर्थी हे सभागृह चिंता व्यक्त करीत आहे."

**मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन**

सोमवार दिनांक ५ ऑगस्ट २००२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या विधानभवनातील (मुंबई) दालनात मा. स्व. श्री. गोविंदभाई श्रॉफ व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे इतर पदाधिकारी यांच्यासमवेत शाळा व महाविद्यालयांच्या थकित वेतनेत्तर अनुदानाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत वेतनेत्तर अनुदानासाठी उपलब्ध तरतूदीचे वाटप करण्यात यावे, हे वाटप प्रमाणशीर होण्याच्या दृष्टीने सूत्र निश्चित करावे, सन १९९८-९९ अखेरची वेतनेत्तर अनुदानाची थकबाकी देण्यासाठी रु. ६ कोटी अतिरिक्त तरतुद उपलब्ध करुन द्यावी, **वेतन अनुदानाच्या उर्वरीत थकित अनुदानासाठी एक कालबद्ध योजना तयार करण्यात यावी व त्याप्रमाणे दरवर्षी आर्थिक तरतूद करुन थकित वेतनेत्तर अनुदानाची रक्कम पूर्णपणे अदा करण्यात यावी असे ठरले होते.**

सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात अशासकीय माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी रु. ४२८०.२१ लक्ष इतकी तरतूद मूळ अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध झाली होती. सन १९९८-९९ अखेरचे वेतनेत्तर अनुदानाची थकबाकी अदा करण्यासाठी रु. ६००.०० लक्ष इतकी तरतुद पूरक मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि, राज्यासमोरील आर्थिक अडचणीमुळे सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात रु. ४८८०.२१ लक्ष इतक्या तरतुदीपैकी रु. २७८१.०० लक्ष इतकीच तरतुद वितरीत होऊ शकली. **शासन ज्ञापन क्र. वेतन /१०९२/४३४/०२/माशि-१, दिनांक ३१ ऑगस्ट २००२ अन्वये वेतनेत्तर अनुदानाचे समान वाटप होण्याच्या दृष्टीने सूत्र निर्धारित करण्यात आले असून, उपलब्ध तरतुदीचे प्रमाणशीर वाटप करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.**

ज्या माध्यमिक शाळांचे अनुदान निर्धारण झाले आहे अशा राज्यातील सर्व अशासकिय माध्यमिक शाळांना १९९८-९९ पर्यंतचे वेतनेत्तर अनुदान अदा करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षात अशासकीय माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी मुळ अर्थसंकल्पाद्वारे रु. ४२९१.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध असून यापैकी वेतनेत्तर अनुदान खर्चावर वित्त विभागाने घातलेल्या ६५ टक्के खर्चमर्यादेच्या अधिन राहून वित्त विभागाच्या मान्यतेने रु. २७८९.०० लक्ष इतकी तरतुद दि. ३० सप्टेंबर, २००३ च्या ज्ञापनाद्वारे वितरित करण्यात आली आहे. दि. ३१ मार्च २००३ पर्यंत अशासकिय माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान अदा करण्याकरीता रु. ३०६३१.९९ लक्ष इतक्या तरतूदीची आवश्यकता आहे. चालू आर्थिक वर्षासाठी नियमित वेतनेत्तर अनुदानाकरीता रु. १०५३८.२५ लक्ष इतक्या तरतूदीची आवश्यकता असून, त्यापैकी चालू आर्थिक वर्षात उपलब्ध रु. ४२९१.०० लक्ष इतकी तरतूद वजा जाता रु. ६२९२.२५ लक्ष इतक्या अतिरिक्त तरतूदीची आवश्यकता आहे. याचाच अर्थ सन २००३-२००४ पर्यंत अशासकिय माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान पूर्णपणे अदा करण्यासाठी रु. ३६९२४.२४ लक्ष इतक्या अतिरिक्त तरतुदीची आवश्यकता आहे.

चालू आर्थिक वर्षात उपलब्ध रुपये. ४२९१.०० लक्ष तरतुदीपैकी वितरीत रु. २७८९.०० लक्ष वजा जाता उर्वरीत रु. १५०१.८५ लक्ष इतकी तरतूद अर्थोपाय दृष्टीकोणातून वितरीत करण्यास वित्त विभागाची सहमती प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

पाचव्या वेतन आयोगाचे थकित प्रदान करणे या बार्बीना प्राथम्यक्रम दिल्याने वेतनेत्तर अनुदानासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध होऊ शकली नाही. राज्य शासनाने शिक्षकांचे वेतन नियमित व्हावे यावर भर दिला असून त्यासाठी पुरेशी तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळेच राज्यभर शिक्षकांचे वेतन नियमितपणे अदा होत आहे. उर्वरीत वेतनेत्तर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे थकित वेतनेतर अनुदान शासनाने मंजूर न केल्यामुळे ८ डिसेंबर २००३ ला महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. सर्व शाळांचे संचालक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी रस्त्यावर आले होते. ५ ऑगस्ट २००२ला मा.मुख्यमंत्र्यांच्या दालनात श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली जी सभा झाली...

**उपसभापती :** मा.सदस्यांनी प्रश्न विचारावा.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** माझा प्रश्न एवढाच आहे की, माध्यमिक शाळेला जे ३६९ कोटी रुपये आणि ज्युनिअर कॉलेजस्ना जे ३ कोटी ४२ लाख रु. देणे आहे त्यासंदर्भात शासनाने आराखडा तयार केलेला आहे काय? आपण याचा आराखडा तयार केलेला आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, १०५ कोटी रुपये चालू वर्षामध्ये जे देणे आहे ते ३१ मार्च, २००४ च्या पूर्वी दिले जाईल कां ?

**श्री.अमरीशभाई पटेल :** सभापती महोदय, आपण यावर्षी ४२ कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. त्यामधून आता पर्यन्त जवळपास २८ कोटी रुपये ६५ टक्के खर्चाप्रमाणे वितरीत केलेले आहेत. आपण राहिलेले १५ कोटी रुपये हे...

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** माझा हरकतीचा मुद्दा आहे जे ४२ कोटी रुपये..

**उप सभापती :** आपण प्रत्येक वेळी असे आरग्युमेंन्ट करु नये.

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** आम्हाला न्याय मिळालेला नाही.

**उप सभापती :** मी बाकीच्या सर्व सन्माननीय सदस्यांना सांगितले की, तुम्ही एका पेक्षा अधिक प्रश्न विचारु नका. एकाला एक न्याय आणि दुस-याला दुसरा न्याय असे कसे होईल.

**श्री.व्हि.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, १९९८-९९ चे जे देणे होते त्यापैकी ४२ कोटी ९१ लाख रुपये दिलेले आहेत पण सन्माननीय मंत्रीमहोदय चालू वर्षाचे दिलेले आहे असे म्हणतात. म्हणून माझा पॉईन्टेड प्रश्न आहे की, १०५ कोटी ८३ लाख रुपये ३१ मार्च २००४ पर्यन्त द्याल कां? श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली जी सभा झाली आणि त्यामध्ये थकीत वेतनेत्तर अनुदानाचा पारुप आराखडा तयार करण्याच्या संदर्भात जी चर्चा झाली त्याप्रमाणे तो आराखडा तयार केला आहे कां ? आपण त्यापैकी वर्षभरात किती देणार आहे ?

**श्री.अमरीशभाई पटेल :** सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले की, ह्यावर्षी जी १९९८-९९ च्या हिशोबाने जी तरतूद केलेली आहे ती आपण ४२ कोटी ९१ लाख तरतूद केलेली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आपण जे म्हटले त्याप्रमाणे त्यांना जेवढे माहित आहे तेवढे ते सांगतात. मी पॉईन्टेड प्रश्न विचारतो की, आपण श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्या शिष्टमंडळाला हा शब्द दिला काय ? आपण काय शब्द दिला तो मी आपल्याला वाचून दाखवितो. आपण तो शब्द पाळणार आहे कां ? सभापती महोदय, यांना नोटीस दिली त्याबद्दल निवेदनामध्ये एक शब्द नाही. सर्व शाळा व कॉलेज ८ तारखेला बंद होती. तुमच्या परिक्षा घेणार नाही, कुलपे लावून ठेवू अशी नोटीस दिलेली आहे. तुम्ही एक शब्द त्यामध्ये टाकला नाही. तुमच्या अधिकार क्षेत्रात नसेल तर तुम्ही मा.सभापतींना सांगा की, मी यापेक्षा जास्त काही करु शकत नाही. मा.मुख्यमंत्री यांना विचारुन उत्तर देतो. सभापती महोदय, श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना काय शब्द दिलेला आहे ते मी वाचून दाखवितो. "At the outset the Hon. Chief Minister unequivocally stated that non-salary grant being a committed expenditure shall have to be paid in full. It was also agreed that remaining dues of non-salary grant up to year 2003, both of schools and colleges, would be provided for in the Budget for the year 2003-2004" तुम्ही हे केले कां ? हे केलेले नाही. माझे म्हणणे आहे की, हा शब्द श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्याबरोबर झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये आहे की नाही? जर असेल तर तरतूद कां केली नाही ?

**श्री.अमरीशभाई पटेल :** सभापती महोदय, मा.मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्याबरोबर मिटींग झाली होती. त्यावेळी मिटींगला मा.मुख्यमंत्री, त्यावेळचे मंत्री, श्री.गोविंदभाई श्रॉफ व प्रतिनिधी होते. त्यावेळी असे ठरले होते की, दरवर्षी १०० कोटी रुपये द्यावयास पाहिजे.आपण त्यावर्षी ४२ कोटीची तरतूद केली. त्यामधून आपण मागील वर्षी २९ कोटी डिसबर्स केले. यावर्षी ४२ कोटीची तरतूद केलेली आहे, त्यामधून २७ कोटी रिलीज केलेले आहेत. आपण बाकीचे आता रिलिज करणार आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपले समाधान झाले कां? श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना शब्द दिला असताना तो पाळू शकत नाहीत? आम्ही विनाकारण प्रश्न विचारीत नाही.**

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**उप सभापती :** मी हे निवेदन राखून ठेवतो. संपूर्ण तपशील व उत्तरासह या अधिवेशनाच्या शेवटी हे निवेदन करावे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आम्ही आपला आदर करतो आणि येथे थांबतो. पण हा मा.मुख्यमंत्र्यांचा शब्द आहे त्यामुळे मा.मुख्यमंत्र्याशी बोलून निवेदन करण्यात यावे.

******

# शालेय शिक्षण विभाग

वेतनेत्तर अनुदानासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांची श्री.बापूसाहेब काळदाते व त्यांचे शिष्टमंडळ यांच्याबरोबर मंगळवार, दिनांक १७ फेब्रुवारी २००४ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता झालेल्या बैठकीत **श्री. गोविंदभाई श्रॉफ यांना दिलेल्या आश्वासनासंबंधात थकीत वेतनेत्तर अनुदान देण्याची बांधीलकी शासनाने मान्य केली** व त्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले. :-

| अ.नं. | मुद्दा | मा.मुख्यमंत्र्यांचे निदेश | संबंधित विभाग | अंमलवजाबणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | अशासकीय माध्यमिक शाळांना थकीत वेतनेत्तर अनुदान अदा करण्या बाबत | अशासकीय माध्यमिक शाळांना चालू आर्थिक वर्षात अतिरिक्त रु. ४०.०० कोटी उपलब्ध करुन देण्यात यावेत | शालेय शिक्षण वित्त विभाग | दि. ३१ मार्च, २००४ पूर्वी |
| २. | अशासकीय माध्यमिक शाळांना थकीत वेतनेत्तर अनुदान अदा करण्या बाबत | अशासकीय माध्यमिक शाळांना थकीत वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी रु. २०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी. | शालेय शिक्षण विभाग, वित्त विभाग | सन २००४-०५ |

१७.२.२००४

ज.मो.फाटक
सचिव शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई-४०० ०३२

प्रत : मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संस्था,
महामंडळ कृति समिती (डॉ.शेखावत)

(१६)

# खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे थकीत वेतनेत्तर अनुदान

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर, २००३ : चौथे अधिवेशन २००३*

सर्वश्री, **व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र अैनापूरे, नितीन गडकरी, पांडूरंग फुंडकर, अशोक मोडक, श्रीमती संजिवनी रायकर, श्री. श्रीकांत जोशी** वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वेय दिलेली सूचना.

"ज्याअर्थी राज्यातील सुमारे १०,२१८ खाजगी माध्यमिक शाळा व ३००२ कनिष्ठ महाविद्यालयाचे सन १९९९ चे मार्च २००३ या चार अर्षाचे थकित वेतनेत्तर अनुदान अनुक्रमे रुपये ३६९३४.२४ लक्ष व ३४२.२२ लक्ष शासनाने मंजूर केलेले नाही, आणि

ज्याअर्थी, ५ ऑगस्ट, २००२ रोजी विधानभवन, मुंबई येथील मा. मुख्यमंत्र्याचे दालनात मा. स्व. गोंविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली "महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळासोबत" झालेल्या बैठकीत उर्वरीत थकीत वेतनेत्तर अनुदानासाठी एक कालबद्ध योजना तयार करुन दरवर्षी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे. आणि

ज्याअर्थी या महामंडळाच्या प्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै २००३ ला मुंबई येथे केलेले लाक्षणिक उपोषण, त्यास अनुषंगाने काही प्रतिनिधींना पोलीस विभागाने अटक केली, आणि

ज्याअर्थी, "विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघाने" मा. मुख्यमंत्र्यांना दिनांक २७ नोव्हेंबर, २००३ रोजी किंवा त्या दरम्यान एक निवेदन देऊन दिनांक ८ डिसेंबर २००३ ला विदर्भ विभागातील सर्व शाळा संस्था बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, आणि

ज्याअर्थी, माध्यमिक/उच्च माध्यमिकच्या शालांत परीक्षेला संस्थेची इमारत न देण्याचा निर्णय घेतला आहे, आणि

ज्याअर्थी इमारत किराया न देणे, विद्युत, दुरध्वनी पुरवठा खंडीत होणे, शैक्षणिक साहित्य शाळांना उपलब्ध करता न येणे, खर्च भागविण्यासाठी नियमबाह्यपणे शिक्षकांच्या वेतनातून काही संस्था चालकांकडून वसूली होणे, इत्यादी कारणाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे, आणि

ज्याअर्थी संस्थाचालक व संस्था प्रमुख शाळा संस्था चालविण्यास असमर्थ झाले असल्याने त्यांच्यात चिंतेचे व नैराश्येचे वातावरण पसरलेले आहे,

त्याअर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करित आहे."

**श्री.राजेन्द्र शिंगणे (शालेय शिक्षण राज्यमंत्री)** : अध्यक्ष महाराज,

"खाजगी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे थकीत वेतनेतर अनुदान याबाबत नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणें मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे

**श्री. अमरीशभाई पटेल, मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन**

सोमवार दिनांक ५ ऑगस्ट, २००२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यतेखाली त्यांच्या विधानभवनातील (मुंबई) दालनात मा. स्व. श्री. गोविंदभाई श्रॉफ व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे इतर पदाधिकारी यांच्यासमवेत शाळा व महाविद्यालयांच्या थकित वेतनेत्तर अनुदानाबाबत बैठक आयोगित करण्यात आली होती. सदर बैठकीत वेतनेत्तर अनुदानासाठी उपलब्ध तरतुदीचे वाटप करण्यात यावे, हे वाटप प्रमाणशीर होण्याच्या दृष्टीने सूत्र निश्चित करावे, सन १९९८-९९ अखेरची वेतनेत्तर अनुदानाची थकबाकी देण्यासाठी रु. ६ कोटी अतिरिक्त तरतुद उपलब्ध करुन द्यावी. वेतन अनुदानाच्या उर्वरित थकित अनुदानसाठी एक कालबद्ध योजना तयार करण्यात यावी व त्याप्रमाणे दरवर्षी आर्थिक तरतूद करुन थकित वेतनेत्तर अनुदानाची रक्कम पूर्णपणे अदा करण्यात यावी असे ठरले होते.

सन २००२-०३ या आर्थिक वर्षात अशासकीय माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी रुपये ४२८०.२१ लक्ष इतकी तरतुद मूळ अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध झाली होती. सन १९९८-९९ अखेरचे वेतनेत्तर अनुदानाची थकबाकी अदा करण्यासाठी रु. ६००.०० लक्ष इतकी तरतुद पूरक मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि, राज्यासमोरील आर्थिक अडचणीमुळे सन २००२-०३ या आर्थिक वर्षात रु. ४८८०.२१ लक्ष इतक्या तरतुदीपैकी रु. २७८१.०० लक्ष इतकीच तरतूद वितरीत होवू शकली. शासन ज्ञापन क्रमांक वेतन १९०२/४३४/०२माशि-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ अन्वये वेतनेत्तर अनुदानाचे समान वाटप होण्याच्या दृष्टीने सूत्र निर्धारित करण्यात आले असून उपलब्ध तरतुदीचे प्रमाणशीर वाटप करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

ज्या माध्यमिक शाळांचे अनुदान निर्धारण झाले आहे अशा राज्यातील सर्व अशासकिय माध्यमिक शाळांना १९९८-९९ पर्यंतचे वेतनेत्तर अनुदान अदा करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षात अशासकिय माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी मूळ अर्थसकल्पाद्वारे रु. ४२९१.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध असून यापैकी वेतनेत्तर अनुदान खर्चावर वित्त विभागाने घातलेल्या ६५ टक्के खर्चमर्यादेच्या अधिन राहून वित्त विभागाच्या मान्यतेने रु. २७८९.०० लक्ष इतकी तरतुद दि. ३० सप्टेबर, २००३ च्या ज्ञापनान्वये वितरित करण्यात आली आहे. दि. ३१ मार्च २००३ पर्यंत अशासकीय माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान अदा करण्याकरीता रु. ३०६३१.९९ लक्ष इतक्या तरतूदीची आवश्यकता आहे. चालू आर्थिक वर्षासाठी नियमित वेतनेत्तर अनुदानाकरीता रु. १०५८३.२५ लक्ष इतकी तरतूद वजा जाता रु. ६२९२.२५ लक्ष इतक्या अतिरिक्त तरतूदीची आवश्यकता आहे. याचाच अर्थ सन २००३-०४ पर्यंत अशासकिय माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान पूर्णपणे अदा करण्यासाठी रु. ३६९२४.२४ लक्ष इतक्या अतिरिक्त तरतूदीची आवश्यकता आहे.

चालू आर्थिक वर्षात उपलब्ध रु. ४२९१.०० लक्ष तरतुदीपैकी वितरीत रु. २७८९.०० लक्ष वजा जाता उर्वरीत रु. १५०१.८५ लक्ष इतकी तरतुद अर्थोपाय दृष्टीकोनातून वितरीत करण्यास वित्त विभागाची सहमती प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या दृष्टीकोनातून केंद्र शासन पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान या कार्यक्रमासाठी राज्य शासनाचे २५ टक्के दायित्व, शिक्षकांच्या नियमित वेतनासाठी पुरेशी तरतूद, शालेय शिक्षण विभागाच्या वेतन अनुदानाच्या जिल्हास्तरीय महत्वाच्या योजनांचे राज्यस्तरीय योजनांमध्ये रुपांतर करुन त्या योजनेअंतर्गत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करणे, पाचव्या वेतन आयोगाचे थकित प्रदान करणे या बाबींना प्राथम्यक्रम दिल्याने वेतनेत्तर अनुदानासाठी पुरशी तरतूद उपलब्ध होऊ शकली नाही. राज्य शासनाने शिक्षकांचे वेतन नियमित व्हावे यावर भर दिला असून त्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळेच राज्यभर शिक्षकांचे वेतन नियमितपणे अदा होत आहे. उर्वरीत वेतनेत्तर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** : सभापती महोदय, राखून ठेवलेले हे निवेदन आहे. महाराष्ट्रातील शिक्षण विभागाच्या नॉन सॅलरीचा हा प्रश्न आहे. ८ डिसेंबर २००३ रोजी राज्यातील सगळया शाळा कॉलेजेस बंद होत्या. ४१२ कोटी रुपयांचे चार वर्षाचे थकीत वेतनेतर अनुदान आहे. ५ ऑगस्ट २००२ रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली मॅनेजमेन्ट असोसिएशनच्या पदाधिका-यांची बैठक झाली होती.त्यामध्ये असा कालबध्द कार्यक्रम ठरविण्यात आला होता की, थकीत वेतनेतर अनुदान टप्प्याटप्प्याने देऊ.त्यावेळी जे ठरलेले आहे आणि ज्याचा उल्लेख मिनिटसमध्ये आलेला आहे त्याप्रमाणे कालबध्द कार्यक्रम निश्चित करणार आहात काय आणि या वर्षी मार्च महिन्याच्या अगोदर किंवा बजेटमध्ये त्याच्या निम्मे वेतनेतर अनुदान द्याल काय ?

**श्री.राजेन्द्र शिंगणे** : ही गोष्ट खरी आहे की राज्यात १९९८-९९ सालानंतर आतापर्यन्तचे वेतनेतर अनुदान देणे बाकी आहे आणि ३१ मार्च २००४ पर्यन्त ४१२ कोटी रुपये वेतनेतर अनुदानाच्या माध्यमातून आपल्याला द्यावयाचे आहेत.५ ऑगस्ट २००२ रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्येष्ठ नेते गोविंदभाई श्रॉफ यांच्या उपस्थित वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत बैठक झाली होती. **त्या बैठकीत चालू वर्षाचे अनुदान आणि थकीत अनुदान देण्याच्या बाबतीत कालबध्द कार्यक्रम आखून ते अनुदान देण्याच्या बाबतीत बैठकी ठरले होते** आणि त्या अनुषंगाने ९८-९९ पर्यन्तचे वेतनेतर अनुदान आपण जवळपास पूर्ण करु शकलो, त्यानंतर वेतनेतर अनुदान तरतूद करुनसुध्दा वितरित करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे.सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे पुढच्या काळात वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी जो कालबध्द कार्यक्रम तयार केलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत शासन प्रयत्नशील राहील.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** : मार्च पूर्वी किंवा बजेटमध्ये यातील निम्मे अनुदान तरी दिले जाईल काय ?

**श्री.राजेन्द्र शिंगणे** : याबाबत निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांनी आता म्हटले आहे की, प्रयत्न केले जातील.. किंवा शासनाच्या या लेखी निवेदनामध्ये जे दिले आहे त्याच्या बाहेर ते फार जाऊ शकतील असे मला वाटत नाही म्हणून मी केवळ माहिती घेण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या त्या बैठकीमध्ये काय ठरले होते ते वाचून दाखवितो. कारण त्या बैठकीमध्ये असे असे ठरले होते हे माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी या सभागृहात मान्य केलेले आहे. तर त्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या परिच्छेद १ मध्ये असे म्हटले आहे की, **"At the out set the Honourable Chief Minister unequivocally stated that non-salary grant being a committed expenditure shall have to be paid in full."** आणि परिच्छेद ५ मध्ये असे म्हटले आहे की," **It was also**

**agreed that remaining outstanding dues of non-salary grant up to year 2003,both of schools and colleges, would be provided for in the Budget for the year 2003-2004." तर हे ठरले होते की नाही ? एवढाच माझा प्रश्न आहे.**

**श्री. राजेंद्र शिंगणे : होय, हे ठरले होते.**

**श्री. बी.टी.देशमुख :** हे ठरले होते हे शासनाने मान्य केले आहे. तर माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की, २००३-०४ च्या बजेटमध्ये हे ठरल्यानुसार तरतूद का करण्यात आली नाही ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** अध्यक्ष महाराज, या संदर्भात शिक्षण विभागाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. वेतनेतर अनुदान देत असताना सर्वांना वेतन देण्याची जबाबदारीही शासनाने पार पाडली आहे. त्यामुळे आज वेतनासंबंधात कोणतीही तक्रार नाही. त्याचप्रमाणे वेतनेतर अनुदाना पेक्षाही इतर ज्या शालेय मागण्या आहेत. मग त्या शालेय पोषण आहार असो, विद्यार्थी विमा काढण्याची बाब असेल ....

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मुद्दा याठिकाणी काय आहे ? तर शालेय शिक्षण विभागाने प्रयत्न केले. म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिल्यानंतरही त्या प्रयत्नांना यश आले नाही. आता ८ तारखेला राज्यातील सर्व शाळा-महाविद्यालये बंद होती. आणि त्यांनी आपल्याला नोटीस देखील त्यासंबंधात दिलेली आहे की, यापुढे आम्ही तुम्हाला शाळा उपलब्ध करून देणार नाही म्हणून. कारण माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द देवूनही तो पाळला जात नसेल तर त्यांनी करायचे काय ? त्या नोटीसीमध्ये म्हटले आहे की, मालमत्ता कर भरला नाही म्हणून इमारतीचे हर्रास निघले आहेत, वीज कनेक्शन फोन कनेक्शन तोडले गेले आहे, वगैरे. आता तुम्ही ४२, ४४ दिले आहे त्यामध्ये मी जात नाही. पण आपण शासनाच्या पातळीवर २००३-०४ च्या अंदाजपत्रकात ही तरतूद करण्याचा शब्द दिला पण तरतुद केलेली नाही, मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला गेला नाही हे लक्षात आणून द्या आणि तो शब्द पाळला जाईल असे प्रयत्न करा. आंदोलनकर्ते या ठिकाणी मोर्चा घेऊन आले होते पण चर्चेसाठी निमंत्रण देऊन कोणी त्यांचेशी बोलले नाही. तेव्हा ती अंदाजपत्रकात पूर्ण तरतुद करण्याचा प्रयत्न आपण कराल काय ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. या वर्षी राज्यातील अनेक संघटनांनी आणि शाळांच्या व्यवस्थापनांनी राज्य सरकारला सांगितले आहे की, या वर्षी वेतनेतर अनुदान दिले नाही तर मार्च-एप्रिलच्या परीक्षांसाठी आम्ही आमच्या इमारती देणार नाही. त्यांना वेतनेतर अनुदान न दिल्यामुळे निश्चितपणे त्यांच्यापुढे गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. कोठे वीज कनेक्शन तोडले गेले आहे तर कोठे टेलिफोनचे कनेक्शन तोडले गेले आहे.. अशा अनेक सुविधा त्यांच्या बंद पडल्या आहेत. म्हणून या वर्षीच्या बजेटमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर देखील याबाबत चर्चा करून जास्तीत जास्त तरतुद वेतनेतर अनुदान मिळण्यासंबंधात करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील राहील.

******

## "प्रेताची तुम्हाला काळजी आहे. जिवंत पोरांची नाही. मुर्दे दाबण्यासाठी एवढी मोठी जागा असूनही विनाकारण शाळेला त्रास देता. अन मुर्दे दाबण्यासाठी अजिबातच जागा नसेल तर माझ्या टाळक्यावर त्यांना दाबा. पण तरीही पोरांच्या क्रिडांगणाला हात लावु नका, समजलं?"

## - भाई सुदाम देशमुख

*भाई सुदाम देशमुख हे त्यावेळी अचलपूर मतदार संघाचे विधानसभा सदस्य होते. अचलपूर - चांदूर बाजार रोडवरील तळेगाव मोहना या गावात सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांची शाळा होती. श्री. भास्करराव मोहोड हे त्या शाळेचे मुख्याध्यापक. भाई हे कम्युनिस्ट पक्षाचे म्हणजे विरोधी पक्षाचे. गावागावात गटबाजी असणारच, राजकारण असणारच. शाळेला लागून असलेली जागा त्या शाळेच्या क्रिडांगणासाठी देण्याचा प्रश्न आला. त्यावेळी भाईंनी घेतलेली भूमिका त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. भास्करराव मोहोड यांच्या "राजकारणाच्या वाळवंटातील झरा.... सुदाम काका" या लेखात आली आहे. भाई हयात असतांना दिनांक १ मे १९९३ रोजीच्या दै. 'हिंदुस्थान' मध्ये प्रसिध्द झालेल्या या लेखातील हा उतारा शब्दशः पुढील प्रमाणे :-*

"ग्रामीण भागातील नव्याने निर्माण झालेल्या शाळांना अनंत अडचणी असतात, क्रीडांगण ही आमची मोठी अडचण. शाळेच्या स्थापनेपासून आम्ही वापरत असलेली क्रीडांगणाची जागा संस्थेनी शासनाला मागीतली होती तसा ठरावही स्थानिक ग्रामपंचायतीने दिला होता. तलाठी कार्यालयाची व शासनाची काहीच अडचण नव्हती. पण मधल्या काळांत ग्रामपंचायतीच्या निवडणुका आल्या व पार पडल्यात. तळेगांव मोहना येथील ग्रामपंचायतमध्ये सत्ता परिवर्तन झाले आणि त्या बरोबरच सर्व सत्य परिस्थितीने घुमजाव केले. आमच्या क्रिडांगणाच्या जागेवर स्मशानभूमी असल्याचा जावई शोध स्थानिक ग्रामीण नेत्यांना लागला. ज्या सभासदांनी पूर्वी स्वतः पुढाकार घेऊन क्रीडांगणाबाबत खास सभा घेऊन ना हरकत ठराव एकमताने दिला होता. त्याच सभासदांना सत्तांतर होताच क्रिडांगणाऐवजी स्मशान दिसायला लागले होते. त्यासाठी सोईचे ते सर्व प्रयत्न व परिवर्तन जाणीवपूर्वक केल्या गेले. ग्रामीण भागातील राजकारण असेच असते. त्याला पेटण्यासाठी "बिडी-बिंडल, आगकाडी" सुद्धा पुरेशी होते. मग क्रिडांगणासारखे कारण तर फारच मोठी गोष्ट!

स्थानिक नेत्यांनी काकांना तळेगांवच्या स्टँडवर गाठले आणि पराचा कावळा करुन शाळेने त्या गांवचे स्मशान कसे गिळंकृत केले याची तक्रार केली. क्षणात काका सावध झाले. सर्व सत्य प्रकार त्यांना माहीत होता. त्यामुळे स्थानिक राजकारणी नेत्यांनी रचलेले कुभांड काकांच्या चटकन लक्षात आले म्हणूनच काकांनी तिथेच तडका फडकी निर्णय दिला. **"तुमचे चुकत आहे. मेलेल्याला तर कोठेही जागा मिळते, जिवंत लेकरांचे भविष्य पाहाना. तुमच्याच मुला मुलींसाठी ही शाळा प्रयत्न करीत आहे. स्मशानाला तर आपल्या जवळ भरपूर जागा आहे. खेळण्यासाठी जागा सोडली तर काही बिघडते काय? तुमच्याच परिसरातल्या १०-१२ गावच्या लहान मुलांना आनंदाने खेळू द्या ना?"**

काकांच्या उत्तराने स्थानिक नेत्यांचा भ्रमनिरास झाला. काकाचा हा रुद्रावतार त्यांना अपेक्षित नव्हता. काका विरोधी पक्षाचे आमदार होते. म्हणून आपण त्यांना आपल्या बाजूने सहज वळवून घेवू ही अपेक्षा असलेल्या स्थानिक नेत्यांना काकांचा निर्णय रुचला नाही. त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी आपला मुद्दा पटविण्यासाठी विविध तर्कासह आपला हट्ट व हेका सुरूच ठेवला. ते पाहून अजातशत्रु काकांनाही आपला सात्त्विक संताप आवरला नाही. ते सात्त्विक संतापाने म्हणाले **"प्रेताची तुम्हाला काळजी आहे. जिवंत पोरांची नाही. मुर्दे दाबण्यासाठी एवढी मोठी जागा असूनही विनाकारण शाळेला त्रास देता. अन मुर्दे दाबण्यासाठी अजिबातच जागा नसेल तर माझ्या टाळक्यावर त्यांना दाबा. पण तरीही पोरांच्या क्रिडांगणाला हात लावु नका, समजलं?"**..... असे पक्षातीत सत्यप्रिय दुरदृष्टीचे आमचे सर्वांचे लाडके सुदाम काका आमच्या मतदार संघाचे आमदार व खासदार होते. हे दुसऱ्या मतदार संघात सांगतांना अभिमान वाटतो."

माणसं येतील, माणस जातील पण मुलांच्या शिक्षणासाठी निर्माण झालेल्या किंवा होत असलेल्या सोयी सुविधांकडे राजकारणी लोकांनी कोणत्या दृष्टीने पाहिले पाहिजे याचा वास्तुपाठच भाईंच्या उपरोक्त उद्‌गारात पहायला मिळतो. ही दृष्टी देणारे विदर्भातील भाई सुदाम व ती दृष्टी जोपासणारे मराठवाड्यातील गोविंदभाई यांच्या कार्यकतृत्वाकडे पाहिले म्हणजे मानवी विकासातील सर्वात महत्त्वाची म्हणून वर्णिल्या गेलेल्या शिक्षण मिळविण्याच्या संधीसाठी आमच्या पूर्वपिढ्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या सोयीसुविधांमध्ये वाढ करुन ती व्यवस्था समृद्ध स्वरुपात पुढच्या पिढीच्या स्वाधीन करण्याचे पुण्य आम्हाला मिळविता आले नाही तर निदान त्या सोईसुविधांची मोडतोड करुन त्या पुढच्या पिढीच्या सुपूर्त करण्याच्या अपयशाचे पाप तरी आपल्या माथ्यावर येणार नाही या भावनेने या पिढीतील प्रत्येकाने या कामात सहभागी झाले पाहिजे. असे वाटल्यावाचून रहात नाही. - **बी.टी.देशमुख**

(१७)

## विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती थकीत वेतनेत्तर अनुदानाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३*

*शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २००३*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले लक्षवेधी सूचनवरील निवेदन*

सर्वश्री, **बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र अैनापूरे** यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वेय दिलेली सूचना.

"विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती अमरावती व नागपूर विभाग" या संघटनेच्या अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी एक निवेदन मा. मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्फत सादर करुन दिनांक ८ डिसेंबर रोजी शाळा, महाविद्यालये बंद आंदोलन, फेब्रुवारी/मार्च २००४ च्या परीक्षेसाठी शाळा महाविद्यालयाच्या इमारती उपलब्ध न करण्याचे आंदोलन, याबाबत दिलेली नोटीस, अनेक वर्षांचे वेतनेत्तर अनुदान न मिळाल्यामुळे विजेची व टेलिफोनची बिले थकणे, कराचा भरणा न केल्यामुळे अनेक महाविद्यालयांना जप्तीच्या नोटीसा प्राप्त होणे, प्रयोग शाळा साहित्याचा तुटवडा, त्याचा शैक्षणिक दर्जावर होत असलेला परिणाम, प्राचार्य फोरम, अमरावती विद्यापीठ अमरावती, यांनी २२.४.२००३ रोजी किंवा त्या दरम्यान, मा. उच्च शिक्षणमंत्री यांना, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून ह्या बाबी लक्षात आणून देणे, त्याबाबतीत कोणतीही कारवाई न होणे, मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळल्या जात नसल्याची करण्यात आलेली तक्रार, ५.८.२००२ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या विधानभवनातील दालनात गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाशी झालेली चर्चा, त्या चर्चेत झालेले निर्णय, मा. गोविंदभाईंनी ८.८.२००२ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देणे, दिलेला शब्द पाळला जात नसल्याची ४.९.२००२ च्या पत्रान्वये त्यांनी केलेली तक्रार, वेतनेत्तर अनुदान देण्याचे बाजूला राहिले ते अनुदान तीप्पटीने कमी करण्याचा उच्च शिक्षण विभागाचा २३.९.२००३ चा शासननिर्णय निर्गमित होणे, तो शासननिर्णय तातडीने रद्द करण्याची करण्यात आलेली मागणी, तसे न केल्याने निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

### मा. मंत्री, उच्च शिक्षण यांचे निवेदन

१. विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ, संयुक्त आंदोलन कृती समिती, अमरावती व नागपूर विभाग या संघटनेच्यावतीने मा. मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत दिनांक २१.११.२००३ रोजी एक निवेदन दिले असून दिनांक ८.१२.२००३ रोजी शाळा, महाविद्यालये बंद आंदोलन करण्याची सूचना दिली आहे.

२. विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ संयुक्त, आंदोलन कृती समिती अमरावती व नागपूर विभाग यांनी दिलेले निवेदन प्राप्त झाल्यानंतर दि. ८.१२.२००३ रोजी होणारा बंद लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अमरावती विद्यापीठाने त्या दिवशी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दि. ८.१२.२००३ रोजी होणाऱ्या परीक्षा दि. २४.१२.२००३ रोजी होणार आहेत. दि. ९.१२.२००३ पासून नियमित वेळापत्रकानुसार परीक्षा सुरु आहेत.

३. शासन निर्णय दि. ३.१०.१९७९ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुज्ञेय बाबींवर वेतनेत्तर अनुदान देण्यात येते. त्यानुसार अमरावती व नागपूर विभागात सन ९८-९९ ते २००१-२००२ पर्यन्त देण्यात आलेली वेतनेत्तर अनुदानाबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वर्ष | दिलेली वेतनेत्तर अनुदानाची रक्कम (रुपये लाखात) | |
|---|---|---|---|
| | | नागपूर | अमरावती |
| १. | १९९८-९९ | ८८ | ५६ |
| २. | १९९९-२००० | २५९ | ११२ |
| ३. | २०००-२००१ | १५२ | १०० |
| ४. | २००१-२००२ | १३९ | १०० |

४. उपरोक्त माहिती पाहता हे स्पष्ट होते की, अमरावती व नागपूर विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांना सन २००१-२००२ पर्यंत वेतनेत्तर अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्यात आलेले आहे.

५. सन २००२-०३ या वर्षात राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी वेतनेत्तर अनुदानासाठी १३६३.१६ लाख एवढी तरतुद उपलब्ध होती. यापैकी अमरावती विभागासाठी रु. १६१ लाख तरतूद उपलब्ध होती. राज्यातील कोणत्याही वरिष्ठ महाविद्यालयासाठी सन २००२-०३ या वर्षात वेतनेत्तर अनुदानासाठी निधी वितरित करण्यात आलेला नाही.

६. शासन निर्णय दि. ३.१०.१९७९ नुसार निश्चित केलेले दर आता कालबाह्य झाल्याने व मधल्या कालावधीत चवथा वेतन आयोग व पाचवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनात वाढ झाल्याने वेतन अनुदानातही वाढ झालेली आहे. त्यामुळे वेतनेत्तर अनुदानासाठी देय होणाऱ्या वेतन खर्चाच्या टक्केवारीत सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार शासन निर्णय दि. २३.९.२००३ नुसार वेतनेत्तर अनुदान, अनुज्ञेय वेतन अनुदानाच्या ५ टक्के करण्यात आले आहे.

७. दि. २३.९.२००३ रोजी सुधारित करण्यात आलेल्या वेतनेत्तर अनुदानाच्या दरानुसार सन २००३-०४ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील १०० टक्के अनुदानित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयांसाठी आवश्यक असणारी रु. ३३,१९,३०,०००/- एवढ्या रकमेती तरतूद अष्टमासिक सुधारित अंदाजपत्रकात उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

८. शासन निर्णय दिनांक २३.०९.२००३ प्रमाणे सन २००३-०४ या वर्षापासून महाविद्यालयांना देय असलेले वेतनेत्तर अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच दिनांक २३.०९.२००३ चा शासन निर्णय सर्व बाबीचा विचार करुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्याचे कोणतेही कारण नाही.

******

(१८)

## हजारो शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविणारा २१ नोव्हेंबर २००३ चा शासन निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३*

*शुक्रवार, दिनांक १९ डिसेंबर २००३*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले लक्षवेधी सूचनवरील निवेदन*

सर्वश्री, **व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र अैनापूरे** यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली सूचना. (लक्षवेधी सूचना) पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांतील शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरिता सुधारित निकष विहित करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने दिनांक २१ नोव्हेंबर २००३ रोजी घातक जाचक व हजारो कर्मचाऱ्यांची सेवामुक्ती करणारा शासन निर्णय निर्गमित केला असणे, चिपळूणकर समितीने अहवालानुसार प्रचलित २८ जून, १९९४ हा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारित निर्णयाची अंमलबजावणी एक महिन्याचे आत करण्याचे योजिले असणे, अस्थायी किंवा ज्यांच्या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेली नाही अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून सेवामुक्त केले जाणार असणे, नवीन शासन निर्णयातील निकषानुसार हजारो कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरवून समावेशनाच्या अटी, शर्ती व कार्यपद्धती नुसार समावेशन करण्याचे ठरविले असणे, राज्यातील शिक्षण संस्थामधील नवीन निकषानुसार कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, अर्धवेळ ग्रंथपाल, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक व चतुर्थश्रेणी, कर्मचारी म्हणजे शिपाई, पहारेकरी, रात्रीचा पहारेकरी, सफाईगार, कामाठी, तेलवाला, हमाल, परिचर, चौकीदार, प्रयोगशाळा परिचर इत्यादी यांच्या एकूण पदांपैकी ५० टक्के कर्मचाऱ्यांची हजारोच्या संख्येने सेवामुक्ती होणे, उर्वरित कर्मचाऱ्यांना जादा कामाचा बोजा देणे, जानेवारी २००४ पासून रिक्त पदे भरण्याची शासनाने केलेली फसवी घोषणा, यामुळे शिक्षकांत निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"

### डॉ. राजेंद्र शिंगणे, मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, दिनांक २१ नोव्हेंबर २००३ अन्वये राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशतः/पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग/कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळांसाठी शिक्षकेतर पदे अनुज्ञेय करण्याकरिता सुधारित निकष विहित करण्यात आले होते. सदर शासन निर्णय या विभागाच्या दिनांक १६ डिसेंबर, २००३ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे.

******

# DECISIONS TAKEN AT THE MEETING HELD ON THE 5TH AUG. 2002 AT VIDHAN BHAVAN, BETWEEN 11.30 TO 1.30 P.M.

A delegation of Maharashtra Education Societies Federation, Maharashtra State Teachers Association, and Maharashtra State Head masters Federation, met Hon'ble Chief Minister of Maharashtra and Hon'ble Ministers of Education Shri. More and Shri. Valse Patil, Chiefly in the matter of outstanding non-salary grants, both of secondary & senior colleges. Throughout Maharashtra, for the last three to five years, major part of Non-salary grants has been outstanding, causing enormous hardship in running the educational Institutions. The meeting was held on the 5th Aug. 2002 at the Vidhan Bhawan-Chamber of the Hon'ble Chief Minister and was attended by concerned Secretaries and Directors, on the one hand, and several members of the delegation including Shri. N.D.Patil from 11.30 to 1.30 p.m.

After considerable discussions, following agreed points emerged.

**महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ**

कार्यालय : १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

दूरभाषा : कार्यालय : (०२०) ४४७०९२७, ४४७०५७३, ४४७९०५८

फॅक्स - ४४७०६४२, ४४८५१४२

**अध्यक्ष : श्री. गोविंदभाई श्रॉफ,**

सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद दूरभाषा (०२४०) ३३११११

**कार्याध्यक्ष : श्री. बी.बी.पाटील,**

रत्नत्रय, सिद्धी विनायक मंगल कार्यालयासमोर, सागरमाळ, कोल्हापूर ४१६ ००८ दूरभाषा (०२३१) ६५५८६२, ६६७४९०

**सहकार्यवाह : डॉ.प्रो.प.भ.कुलकर्णी**

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाषा नि. (०२०) ४४७५७३

Shri. Vilasraoji Deshmukh,
Hon'ble Chief Minister,
Maharashtra State, Bombay.

Dear Shri. Vilasraoji Deshmukh,

We are herewith enclosing a write-up about the decisions arrived at the meeting held at Vidhan Bhawan, at Hon'ble Chief Ministers Chambers, on the 5th Aug. 2002 at 11.30 a.m. of course that is our version. Hope you will confirm the same. or let us know as to modifications which need to be made forthwith.

We hope and trust that the points agreed upon shall be adhered to, that necessary steps would be taken with regard to equitable distribution, and that every attempt would be made for providing non-salary grants of the schools for the year 1999-2000, and which may be if necessary provided in the supplementary budget for the year 2002-2003.

with deep regards,

Yours sincerely,
(Govindbhai shroff)
President

(1) At the outset the Hon'ble Chief Minister unequivocally stated that Non-Salary grant being a committed expenditure, shall have to be paid in full.

(2) considering the paucity of funds with the Governments following decisions were taken.

As far as secondary schools are concerned,

(i) Full-payment due up to 1999 would be cleared at the earliest and,

(ii) That an attempt will be made for payment of non-salary grant for the year 1999-2000 would be made and provided in the supplementary budget of 2002-2003. It was also agreed that a similar meeting with the delegation will be held in November 2002.

(3) (i) As regards senior colleges, It was agreed that non-salary grant due up to 2001 will be paid at the earliest during the year 2002.

(ii) It was also agreed that assessments of non-salary grant would be completed to date and reports made to the college and the Government. The work need to be completed by at the earliest, well-before supplementary budget.

(4) Considering the fact, that the funds provided for payment of non-salary grants, were unevenly distributed to the various districts, it was decided that outstanding dues of schools/Colleges, which are pending for longer time shall be paid on priority basis. Guidelines to that effect will be given to distributing Authorities.

(5) It was also agreed that remaining outstanding dues of non-salary grant up to year 2003, both of schools and colleges, would be provided for in the budget for the year 2003-2004.

Further in the course of discussions it was keenly felt that there needs to be a wider coordination and cooperation, in developing the education system, particularly in the matter of evolving new policies and approaches, particularly when, it has been an uninquire feature of Maharashtra that except for primary education, the whole education field is mostly covered by the education societies, of course with the support of the Government. For smoother working. It is no gain saying, that there is urgent need of confidence building. In fact it was suggested for the consideration of the Government, that it is high time, that role and responsibilities of the four constituents of educational systems, namely the Government, the universities, the educational societies and the Teaching community be clearly defined, and a common educational objective setup, leading to harmonious working of educational system.

(Govindbhai Shroff)
President

******

# *महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळ, आंदोलन कृति समिती*

केंद्रीय कार्यालय : विद्याभारती शैक्षणिक मंडळ, विद्याभारती महाविद्यालय परिसर, सी.के.नायडू रोड, कॅम्प, अमरावती.
फोन नं. ०७२१-२६६२७४० दिनांक २७.०१,०४
डॉ.देविसिंह शेखावत, अध्यक्ष, श्री.के.के.जोशी, सचिव, डॉ.प.भ.कुळकर्णी सरकार्यवाह, श्री. वसंत पवार, माजी खासदार, नाशिक, श्री. तानाजी भोईटे, जळगांव

प्रति,

**मा. श्री.सुशिलकुमारजी शिंदे**

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई

व्दारा :- मा. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

**विषय :-** शाळा महाविद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत यापूर्वी मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द न पाळता, शासन विपरीत भूमिका घेत असल्यामुळे शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाने पुकारलेल्या आंदोलनाची पूर्वसूचना.

महोदय,

१. सविनय निवेदन करण्यात येते की, महाराष्ट्रातील खाजगी माध्यमिक शाळा व महाविद्यालयांचे थकीत वेतनेत्तर अनुदान शासनाने अजूनही दिलेले नाही. याप्रकरणी शासन अजूनही गंभीर नाही, हे दुर्दैव आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष स्व. गोविंदभाई श्रॉफ यांचेशी दि. ०५.०८.२००२ झालेल्या चर्चेत मा. मुख्यमंत्री यांनी वेतनेत्तर अनुदानासंबधी दिलेला शब्द शासनाने पाळला नाही. याउलट, मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाच्या विपरीत शासन निर्णय निर्गमित झालेले आहेत, त्यामुळे राज्यातील शिक्षण संस्था चालकांमध्ये व एकूणच शिक्षण क्षेत्रात कमालीचा असंतोष निर्माण झाला आहे.

२. "सन २००३ पावेतोच्या शाळा महाविद्यालयांचे संपूर्ण थकीत वेतनेत्तर अनुदान अदा करण्यासाठीच्या रकमेची तरतूद २००३-०४ च्या अंदाजपत्रकात करण्यात यावी. असे स्पष्ट आदेश मा. मुख्यमंत्र्यांनी दि. ०५.०८.२००२ रोजीच्या बैठकीच्या वेळी दिले होते." ही गोष्ट मा. शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी विधान परिषदेत दि. १९.१२.२००३ रोजी प्रांजळपणे कबूल केलेली आहे. (पीपी-१) तशीच कबुली मा. उच्च शिक्षण मंत्री यांनी विधानपरिषदेत दि. ११ डिसेंबर, २००३ रोजी दिलेली आहे. (एफएफ-३).

३. मा. मुख्यमंत्री यांनी दिलेला शब्द पाळल्या तर गेला नाहीच उलट, वरिष्ठ महाविद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान १८ टक्क्यावरून केवळ ५ टक्के देण्यात येईल, असा शासन निर्णय दि. २३.०९.२००३ रोजी निर्गमित करुन शासनाने शिक्षण संस्थावर कुठाराघातच केला आहे. हा निर्णय रद्द करण्याबाबत विधान परिषदेत दि. ११ डिसेंबर २००३ रोजी झालेल्या चर्चेमध्ये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी निर्णय रद्द करणार नाही, असे ठणकावत सांगून आमच्या जखमेवर मीठ चोळले आहे. "या निर्णयाचा पुर्नविचार करणे शक्य नाही"(जीजी-२) असे जे उद्गार मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधानपरिषदेत काढले, त्यातून दिसून आलेली दर्पोक्ती, शिक्षणाविषयीची अनास्था व ग्रामीण शिक्षण व्यवस्थेविषयी जे अज्ञान उघडपणे पाझरते त्याची करावी तेवढी कीव थोडीच आहे.

४. स्व. गोविंदभाई श्रॉफ यांच्या सारख्या शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तपस्वी व्यक्तीने महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेच्या जपवणूकीसाठी मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन मिळविलेला शब्द गोविंदभाईच्या निधनानंतर मात्र पायदळी तुडविल्या जातो, याचे महाराष्ट्र राज्य शिक्षण व्यवस्थापन महामंडळाला तीव्र दुःख होते. स्व. गोविंदभाई श्रॉफ यांचेविषयीचा आदर आणि शिक्षण व्यवस्थेच्या सुचारु संचालनाविषयीचा आदर मुख्यमंत्री पदावरील व्यक्ती बदलल्यामुळे कमी होतो असे ध्वनित करणारे "मा. मुख्यमंत्री महोदयांनी गोविंदभाई श्रॉफ यांचे आदरापोटी त्याठिकाणी झालेल्या चर्चेला होय असे उत्तर दिले"(जीजी-२) असे उद्गार मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधानपरिषदेत दि. ११.१२.२००३ रोजी काढलेत, त्याची करावी तेवढी कीव थोडीच आहे.

५. मा. मुख्यमंत्र्यांनी महामंडळाला दिलेला शब्द पाळला नाही. एवढेच नव्हे तर स्व. गोविंदभाई श्रॉफ सारख्या जागृत शिक्षणप्रेमी, आदरणीय व महाराष्ट्राला ललामभूत असणाऱ्या व्यक्तीचा एका प्रकारे अनादर केलेला आहे. याबद्दल आम्हाला अत्यंत खेद वाटतो, प्रगतिशील शिक्षण क्षेत्राचा नावलौकिक असलेल्या महाराष्ट्रात शिक्षणाविषयी शासन एवढे नकारात्मक व उदासीन असावे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. शिक्षण संस्थाच्या अत्यंत माफक मागण्यांकडे लक्ष देऊन त्या पूर्ण करण्याची शासनाने आज पर्यंतही तसदी घेतली नाही. त्यामुळे संबंध महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्याचा आमच्या संघटनेने जो निर्णय घेतला, त्याची पार्श्वभूमी उपरोक्तप्रमाणे आहे.

६. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या मागण्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

*१) सकल वेतनेत्तर अनुदान देण्याची शासनाची बांधिलकी मान्य करुन, २००३ पर्यंतचे शाळा महाविद्यालयांचे पूर्ण थकीत वेतनेत्तर अनुदान मार्च २००३ च्या अंदाजपत्रकाद्वारे अदा करण्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या शब्दाची बूज राखून सर्व शाळा महाविद्यालयांचे थकीत वेतनेत्तर अनुदान अविलंब देण्यात यावे.*

*२) दिलेला शब्द पाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी मेहनत न घेता उच्च शासकीय अधिकाऱ्यांच्या कपट कारस्थानातून काढण्यात आलेला व तो शब्द पायदळी तुडविणारा शासन निर्णय (क्रमांक एम.एन.जी.सी.-२००३/(३१४/०३/म.शि.-३/दिनांक २३.०९.२००३) अविलंब रद्द करावा.*

*३) शासनाच्या अनिष्ट धोरणामुळे राज्यात विनाअनुदानित, कायम विना अनुदानित, शाळा महाविद्यालये मोठ्या प्रमाणावर सुरू झालीत, त्यामुळे पूर्वीच्या शाळा महाविद्यालयांच्या पटसंख्या कमी झाल्या, शिक्षक अतिरिक्त झाले. समायोजनाच्या जटील समस्या निर्माण झाल्या, अशा बदललेल्या परिस्थितीचा विचार करुन तुकड्यांच्या पटसंख्येचे निकष बदलविण्यात यावे.*

*४) पटसंख्या अभावी अनुदानीत तुकड्या बंद झाल्यास, त्याच ठिकाणी मागणी असल्यास, अनुदानीत तुकडी देण्याचे धोरण असावे. जिल्ह्यातील शाळा महाविद्यालयांच्या बंद झालेल्या अनुदानित तुकड्या त्याच जिल्ह्यात अनुदान तत्त्वावरच देण्यात याव्यात.*

*५) शाळा महाविद्यालयांचे सत्र फीचे दर अनेक वर्षापूर्वी ठरलेले होते. तेच आजही कायम आहे. हे दर काळानुरुप बदलविणे अत्यंत गरजेचे आहे. सत्र फीचे दर वाढवून द्यावे.*

*६) आरक्षण निर्धारणाची (बिंदू नामावली पडताळणी) पद्धत राज्यात सर्व विभागात सारखी असावी. शिक्षण संस्थामधील आरक्षणनिर्धारण, दिनांक १९.०६.१९९६ च्या शिक्षण विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असे दोनच संवर्ग गृहीत धरून केले जावे.*

*७) शिक्षण संस्थामधील शिक्षकेतर कर्मचारी भरतीवरील बंदी त्वरित उठवावी.*

*८) खुल्या प्रवर्गातील कर्मचारी भरतीची परवानगी अविलंब देण्यात यावी.*

*९) महाविद्यालयांची तपासणी करुन गुणांकन करणाऱ्या "नॅक" कमेटीच्या भेटीच्या निमित्ताने केलेला व करावयाचा खर्च महाविद्यालयाच्या वेतनेत्तर अनुदानास पात्र समजण्यात यावा.*

७. शिक्षण संस्था समोरील समस्या विचारात घेता, वरील प्रमाणे आमच्या अत्यंत माफक मागण्या आहेत. परंतु दुर्दैवाने पूर्तता अद्यापही झालेली नाही. शिक्षण संस्थांच्या या मागण्यांकडे पाहण्याची शासनाची दृष्टी अत्यंत नकारात्मक व उदासीन आहे. निवेदने, चर्चा, धरणे, उपोषण, आंदोलने, ही सर्व कुचकामी ठरली आहेत. शासन अजूनही दखल घेऊन दिलेली आश्वासने पाळत नाही व पूर्तता करीत नाही, अशी आमची ठाम समजूत झालेली आहे. याकरिता मागण्यांच्या पूर्ततेसाठी अधिक तीव्र आंदोलन करुन शासनाशी लढा देणे क्रमप्राप्त झाले आहे.

सबब, शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळाच्या आंदोलन कृती समितीने राज्यभर उग्र आंदोलन करण्याचे ठरविले आहे. मुख्याध्यापक संघ, सर्व शिक्षक संघटना, प्राचार्य फोरम, प्राध्यापक संघटना, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, शिक्षकेतर कर्मचारी संघटना व पालक संघटना या सर्वांनी या आंदोलनास पाठिंबा दिलेला आहे.

८. आंदोलनाचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील.

"येत्या फेब्रुवारी, मार्च, एप्रिल - २००४ मध्ये होणाऱ्या राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा व विद्यापीठांच्या महाविद्यालयीन उन्हाळी परीक्षांसाठी संस्था चालक आपल्या इमारती व फर्निचर उपलब्ध करुन देणार नाही"

अशाप्रकारचे प्रखर आंदोलनाचे स्वरूप आंदोलन कृती समितीने ठरविलेले आहे. आंदोलन यशस्वीपणे पार पाडण्यास सर्व सहभागी संघटना कटिबद्ध आहेत.

संभाव्य परिणामांची जबाबदारी शासनाची राहील. करीता हे पूर्व सूचना पत्र देण्यात येत आहे.

आपले

(डॉ. देविसिंह शेखावत) (के.के.जोशी) (डॉ.प.भ.कुळकर्णी)
अध्यक्ष सचिव सरकार्यवाह

***महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळ आंदोलन कृती समिती***

(श्री. वसंतराव धोत्रे) (डॉ.अनिल वऱ्हाडे) (एन.एस.उर्फ भैय्यासाहेब देशमुख)
अध्यक्ष कार्याध्यक्ष कार्याध्यक्ष

***(विदर्भ आंदोलन संयुक्त कृती समिती)***

# शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेला दि. २१ नोव्हेंबर २००३ रोजीचा घातक, जाचक व हजारो कर्मचाऱ्यांची सेवामुक्ती करणारा शासन निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३*

***गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर २००३***

**सर्वश्री व्हि.यु. डायगव्हाणे,बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे,प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेन्द्र अैनापूरे,** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना खालीलप्रमाणे ....

"ज्याअर्थी राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अंशतः पूर्णतः अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिकचे वर्ग, कनिष्ठ महाविद्यालये व सैनिकी शाळातील शिक्षकेत्तर पदे अनुज्ञेय करण्याकरिता सुधारित निकष विहित करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने दि. २१ नोव्हेंबर २००३ रोजी घातक, जाचक व हजारो कर्मचाऱ्यांची सेवामुक्ती करणारा शासन निर्णय निर्गमित केला आहे, आणि;

ज्याअर्थी, चिपळूणकर समितीचे अहवालानुसार प्रचलित २८ जून, १९९४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारीत निर्णयाची अंमलबजावणी एक महिन्याचे आत करण्याचे योजिले आहे, आणि;

ज्याअर्थी, अस्थायी किंवा ज्यांच्या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेली नाही अशा हजारो कर्मचाऱ्यांना सेवेतून सेवामुक्त केले जात आहे, आणि;

ज्याअर्थी नवीन शासन निर्णयातील निकषानुसार अतिरिक्त ठरवून समावेशनाच्या अटी, शर्ती व कार्यपद्धतीनुसार समावेशन करण्याचे ठरवले असताना तेवढ्या जागा रिक्त नाहीत, आणि

ज्याअर्थी, एकूण पदांपैकी ५० टक्के कर्मचाऱ्यांची पदे रद्द करणे किंवा व्यपगत किंवा अतिरिक्त करण्याचे शासनाने ठरविले आहे, आणि

ज्याअर्थी राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांची सेवामुक्ती करणे, पूर्वीची पदे व्यपगत करणे व उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा जागा बोझा टाकण्याचे ठरविले आहे, आणि;

ज्याअर्थी, शासनाने जानेवारी, २००४ पासून रिक्त पदे भरण्याची फसवी व विसंगत घोषणा केलेली आहे,

त्याअर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

**डॉ. राजेंद्र शिंगणे, मा. राज्यमंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर अनुदानित शिक्षण संस्थातील कर्मचाऱ्यांच्या आस्थापनेवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाणे राज्याच्या एकूण महसूली खर्चाच्या प्रमाणात प्रचंड असल्यामुळे राज्य शासनाच्या इतर कल्याणकारी योजनांसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चासाठी निधीचा तुटवडा जाणवत असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आस्थापनेवरील खर्चात कपात करुन होणारी बचत इतर विकास क्षेत्रात वापरण्याचे धोरण राज्य शासनाने अंगीकारले आहे. याच भूमिकेतून राज्यात नवीन पदे तयार करणे, रिक्त पदे भरणे इत्यादीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

शासनाने स्विकारलेल्या वरील धोरणानुसार अनुदानित शिक्षण संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांचा व प्रचलित असलेल्या आकृतीबंधाचा आढावा घेऊन नवीन आकृतीबंध विहित करणे अत्यावश्यक होते.

राज्य शासनाला शिक्षण या विकास क्षेत्राबरोबरच मानवी जीवनाशी निगडीत इतरही मुलभूत क्षेत्रावर (उदा. आरोग्य, रस्ते, वाहतूक) खर्च करावा लागतो. चालू आर्थिक वर्षी शालेय शिक्षण विभागाच्या खर्चाचे प्रमाण राज्याच्या एकुण महसुली खर्चाच्या प्रमाणात १८.४२ टक्के इतके आहे. उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण यावर होणाऱ्या खर्चाचा विचार करता, शिक्षण या विकास क्षेत्रावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण राज्य शासनाच्या एकूण महसूली खर्चाच्या साधारणपणे २५ टक्के इतके आहे. राज्य शासनापुढे इतरही महत्वाची प्राधान्य क्षेत्रे असल्यामुळे प्राप्त परिस्थितीत या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाही.

साधारणतः या परिस्थितीत शिक्षणावरील खर्चात वाढ करणे शक्य नसल्यामुळे अशासकीय माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांचा आढावा घेऊन उपलब्ध तरतुदीमध्ये जास्तीत जास्त शाळांमधील पदे कशी भरता येतील व त्याचा लाभ अधिकाधिक शाळांना कसा होईल या दृष्टीने शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सुधारीत आकृतीबंधा बाबतचा शासन निर्णय दिनांक २१ नोव्हेंबर, २००३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

सुधारीत आकृतीबंध लागू केल्यावर मान्य व अनुदानित शाळांमधील कायम सेवेतील मंजूर, निर्बाध, आरक्षित किंवा अनारक्षित पदावर पूर्ण वेळ

## विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ,

### विदर्भ संयुक्त आंदोलन कृति समिती

केंद्रीय कार्यालय : विद्याभारती शैक्षणिक मंडळ, विद्याभारती महाविद्यालय परिसर, सी.के.नायडू रोड, कॅम्प, अमरावती.
फोन नं. ०७२१-२६६२७४०

श्री. वसंतराव धोत्रे, अध्यक्ष : श्री. कृ.वा.तारे, सचिव
श्री. डी.जी.उर्फ भैयाजी देशमुख सचिव,
**दिनांक १५.१.२००४**

प्रति,
मा,शिवाजीराव पाटील निलंगेकर
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. माणिकराव ठाकरे
उर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य

**विषय :-** नागपूर येथे दि. ८.१२.०३ ला विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ व अन्य शैक्षणिक संघटनांच्या मोर्चाला मुख्यमंत्री यांचे सोबत बैठक व चर्चा घडवून आणण्याबाबतचे आपण दिलेल्या आश्वासनाबाबत.

महोदय,

सविनय निवेदन करण्यात येते की, गेले चार पाच वर्षापासून खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळा- महाविद्यालयांना वेतनेत्तर अनुदान शासनाकडून मिळाले नाही. त्यामुळे शिक्षण संस्था भयंकर आर्थिक अडचणीत आल्या आहेत. वेतनेत्तर अनुदान मिळणेसाठी विविध आंदोलने करुन शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ सर्व शिक्षण संघटनांसह शासनाचे लक्ष वेधत आहे.

दि. ८.१२.०३ ला संघटनांचा भव्य मोर्चा नागपूर येथील विधान भवनावर नेण्यात आला होता. ह्या मोर्चाला सामोरे येऊन आपण आमचे निवेदन स्विकारले होते. आमदार श्री. बी.टी.देशमुख हेही उपस्थित होते. ह्यावेळी आमच्या प्रश्नांसंदर्भात मुख्यमंत्री यांचेशी बोलून आपली चर्चा घडवून आणू असे आपण आश्वासन दिले होते.

परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीच कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. कृपया भेट व चर्चा होण्यासंबंधी उचीत कार्यवाही त्वरीत व्हावी ही विनंती. अन्यथा वेतनेत्तर अनुदान मागणी संदर्भात अधिक तीव्र आंदोलन आम्ही सुरु करीत आहोत. सभाव्य जबाबदारी आपल्या शासनावर राहील.

आपला
(वसंतराव धोत्रे)
अध्यक्ष
विदर्भ आंदोलन कृती समिती, अमरावती.

कार्यरत आणि ज्यांच्या नेमणूकीस सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मान्यता आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांना सेवेचे संरक्षण देण्यात आले असून दिनांक २१ नोव्हेंबर, २००३ च्या शासन निर्णयानुसार असा कोणताही कर्मचारी सेवेतून कमी केला जाणार नाही.

**श्री. व्हि. यु. डायगव्हाणे** : सभापती महोदय, सा-या महाराष्ट्राला जाचक केलेली अशी ही सूचना आहे. शालेय शिक्षण विभागाकडे माध्यमिक,उच्च माध्यमिकच्या ज्या काही शाळा आणि वर्ग साऱ्या महाराष्ट्रात आहेत. त्या एकूण शाळांमध्ये जे नॉन टिचिंगचे कर्मचारी आहेत. खरे म्हणजे हा जो पॅटर्न आहे हा स्कूल कोडमध्ये आहे. याच्या नंतर कर्मचारी कमी पडतात म्हणून डायरेक्टर चिपळूणकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यांनी अहवाल दिला त्याप्रमाणे क्लार्क, नॉन टिचिंग स्टाफ, लेबॉरटरी, लायब्ररीची पदे ही जेवढी काही नॉन टिचिंगची पदे आहेत ती भरण्याची संमती शासनाने दिली आणि कारवाई करीत आहेत. २१ नोव्हेंबरला शासनाने, स्कूल कोडचा विचार न करता, रुल्सचा विचार न करता किंवा ॲक्टला कोठेही समोर न आणता आणि कोणाशीही चर्चा न करता जी.आर.काढलेला आहे. सर्व महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राचा हा प्रश्न आहे. २१ नोव्हेंबरच्या जी.आर.प्रमाणे १ लाख कर्मचारी सेवेतून कमी होणार आहेत. परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की आम्ही नवीन पदे भरणार, आम्ही नोकऱ्या देणार, परंतु या ठिकाणी मात्र महाराष्ट्रामध्ये १ लाख कर्मचारी एक महिन्यामध्ये कमी होणार आहेत. इतका हा प्रश्न तीव्र आहे. यामध्ये काय म्हटले आहे ? अनेक मान्यवरांना माहीत नाही म्हणून मी दोन तीन मुद्दे वाचून दाखवितो. १००० पर्यन्त विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेमध्ये १ कनिष्ठ लिपीक राहील. म्हणजे तो सुटीवर गेला किंवा बिमार पडला तर ते काम मुख्याध्यापकाने किंवा शिक्षकाने करावयाचे. १००१ ते २००० विद्यार्थी संख्या असेल तर फक्त २ क्लार्क असतील. त्यानंतर प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी अशी व्यवस्था केली आहे की, यापुढे कोणताही प्रयोग करावयाचा नाही. लेबॉरेटरीला कुलूप लावून ठेवा, अजिबात कर्मचारी मिळणार नाही. २० रुपये तासाप्रमाणे आणि प्रत्येक दिवशी ३० रुपये रोजंदारीवर प्रयोग शाळा सहाय्यक मिळतील. १ ते ३ तुकडया असतील तर २० रुपये तास किंवा ३० रुपये रोज, १ ते ६ तुकडया असतील तर २० रुपये तास किंवा ५५ रुपये प्रति दिवशी, १ ते ९ तुकडया असतील तर २० रुपये तास किंवा ८० रुपये याप्रमाणे यापुढे रोजंदारीवर प्रयोग शाळा सहाय्यकांची पदे भरली जातील. यापुढे जे असिस्टंट आणि अटेंडंट येतील ते रोजंदारीवर येतील आणि जे आहेत ते सरप्लस होतील. सन्माननीय सदस्य श्री. पटने साहेब या ठिकाणी बसलेले आहे. ग्रंथपालांच्या बाबतीत, ग्रंथालय चळवळ वाढावी असे शासनाचे धोरण आहे. या ठिकाणी असे म्हटले आहे की, १०० ते १००० विद्यार्थी असतील तर प्रती दिवशी २० रुपये रोजीने बोलवावे. आता तुम्हाला अर्धवेळ लायब्ररीयन किंवा

## *महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळ,*
## आंदोलन कृति समिती

केंद्रीय कार्यालय : विद्याभारती शैक्षणिक मंडळ, विद्याभारती महाविद्यालय परिसर, सी.के.नायडू रोड, कॅम्प, अमरावती.

डॉ.देविसिंह शेखावत, अध्यक्ष, : श्री.के.के.जोशी, सचिव, :
डॉ.प.भ.कुळकर्णी सरकार्यवाह,: श्री. वसंत पवार, माजी खासदार, नाशिक,

आज दि. ९.२.०४ ला मा. शालेय शिक्षण मंत्री श्री. अमरीशभाई पटेल यांचे निमंत्रणावरून दुपारी १ वाजता त्यांचे निवासस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे आंदोलन कृतिसमितीच्या शिष्टमंडळासोबत बैठक झाली. शिष्टमंडळाचे नेतृत्त्व आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष डॉ.देविसिंह शेखावत यांनी केले.

शाळा महाविद्यालयांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत महाराष्ट्र राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेले अभिवचन पाळल्या जावू नये ही अत्यंत दुःखाची दुर्दैवाची व निषेधाची गोष्ट आहे. आज महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. अमरीष भाई पटेल यांचे समवेत झालेल्या बैठकीत शाळा महाविद्यालयांच्या वेतनेत्तर अनुदानासंबंधी मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळण्यासंबंधी मंत्र्यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे बैठक निष्फळ ठरली.

त्यामुळे वर्ग १० व १२ वी तसेच महाविद्यालयीन उन्हाळी परीक्षांना शाळा व महाविद्यालयाच्या इमारती व फर्निचर न देण्याचे आंदोलनाचा निर्णय कायम राहील असा ठाम निर्णय आंदोलन कृति समितीने घेतला. एकापेक्षा जास्त खात्यांचा ह्यामध्ये संबंध असल्यामुळे याबाबत मुख्यमंत्र्यांनाच निर्णय घ्यावा लागेल. मा. मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनाच वेळ मिळू नये याबद्दल कृति समितीला अत्यंत दुःख होते. याबद्दलची तीव्र नाराजी व्यक्त करतांना आंदोलनाच्या परिणामाची संपूर्ण जबाबदारी शासनावर राहील ह्याची जाणीव मंत्री महोदयांना देण्यात आली.

ह्या बैठकीच्या वेळी सांसदीय कार्यमंत्री ना. डॉ.पतंगराव कदम, शालेय शिक्षण सचिव श्री. जयराम फाटक, माध्यमिक शालेय शिक्षण संचालक वसंत पाटील तर आंदोलन कृति समितीच्या मंडळात आंदोलन कृति समितीचे मार्गदर्शक जेष्ठ आमदार श्री. प्रा.बी.टी.देशमुख, महामंडळाचे सरकार्यवाह डॉ.प.भ.कुळकर्णी संघटक, श्री.एन.सी.जोशी, कृति समितीचे सरकार्यवाह श्री. के.के.जोशी, मुंबई विभागाचे अध्यक्ष श्री.प.म.राऊत कार्यवाह श्री.अविनाश तांबे, नागपूर विभागातील ॲड.भैय्यासाहेब देशमुख, अमरावती विभागाचे कार्याध्यक्ष डॉ.अनिल वऱ्हाडे, प्राचार्य फोरमचे सदस्य, प्रा.टी.ए.शिवारे, डॉ.एन.एन.कुळकर्णी व नाशिक विभागातून श्री. महेंद्र निळे उपस्थित होते.

९.२.२००४

(डॉ. देविसिंह शेखावत)
अध्यक्ष

## विदर्भ शिक्षण संस्था व्यवस्थापन संघ,
## विदर्भ संयुक्त आंदोलन कृति समिती

केंद्रीय कार्यालय : विद्याभारती शैक्षणिक मंडळ, विद्याभारती महाविद्यालय परिसर,
सी.के.नायडू रोड, कॅम्प, अमरावती. फोन नं. ०७२१-२६६२७४०

**श्री. वसंतराव धोत्रे, श्री. कृ.वा.तारे, श्री. डी.जी.उर्फ भैयाजी देशमुख**
अध्यक्ष, सचिव सचिव,

## प्रेस नोट

म.रा.शिक्षण संस्था व्यवस्थापन महामंडळ तथा म.रा.माध्य. व उच्च माध्य शाळा मुख्याध्यापक संघ संयुक्त महामंडळ यांच्या संयुक्त आंदोलन कृती समितीने शाळा महाविद्यालयांच्या वेतनेत्तर अनुदान मागणीसाठी गेल्या दोन वर्षापासून विविध प्रकारे आंदोलने केलीत. शासनाने फारशी दखल न घेतल्याने येत्या फेब्रु-मार्च २००४ मध्ये होणाऱ्या शिक्षण मंडळांच्या व विद्यापीठांच्या परीक्षांना इमारती व फर्निचर न देण्याचा निर्णय घेतला होता, ह्या निर्णयास मुख्याध्यापक संघाने सक्रीय पाठिंबा दिला.

परीक्षा अडचणीत येणार हे लक्षात घेऊन शासनाने व्यवस्थापन महामंडळ आंदोलन कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना मुंबईला दिनांक १७.०२.२००४ ला प्रत्यक्ष चर्चेला बोलाविले होते. मा. सुशिलकुमार शिंदे, मुख्यमंत्री, मा.श्री. जयंत पाटील, अर्थमंत्री तथा खात्याचे सचिव यांचेशी चर्चा होऊन संघटनांची वेतनेत्तर अनुदानाची मागणी मान्य करण्यात आली. वेतनेत्तर अनुदानातील ४० कोटी रुपये ३१ मार्च २००४ पर्यंत तातडीने वितरीत करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. रु. २०० कोटीची तरतूद २००४-२००५ च्या अंदाजपत्रकात करण्यात येईल. २००४-०५ ह्या वर्षात हे वितरण होईल. वेतनेत्तर अनुदान बंद करणार नाही, चर्चेदरम्यान मा. मुख्यमंत्री यांनी वरीलप्रमाणे लेखी आश्वासन शिष्टमंडळाला दिले. तसेच महाविद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान केवळ ५ टक्के करण्याबाबतच्या दिनांक २३.९.२००३ च्या शासन निर्णयावर फेरविचार करण्याचे मा. मुख्यमंत्री यांनी मान्य केले. चर्चेअंती प्रमुख मागण्या मान्य झाल्यामुळे संघटनेने आंदोलन मागे घेतले आहे. परीक्षांना आपल्या इमारती व फर्निचर उपलब्ध करुन देऊन सहकार्य करण्याचे आवाहन संस्था चालक, प्राचार्य व मुख्याध्यापक यांना आंदोलन कृती समितीने केले आहे.

महाराष्ट्र राज्य आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष डॉ.देविसिंह शेखावत व आमदार प्रा.बी.टी.देशमुख यांनी शासनाकडून मागण्या मान्य करुन घेण्यासाठी अथक परिश्रम घेतले. मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करण्यास डॉ. देविसिंह शेखावत, आमदार प्रा.बी.टी.देशमुख, डॉ.अनिल वऱ्हाडे, के.के.जोशी, विनोद गुडधे पाटील, बाबुरावजी झाडे, डॉ.वसंत पवार (नाशिक), बापूसाहेब काळदाते, डॉ.प.भ.कुळकर्णी (पुणे) प.म.राऊत (मुंबई), तांबे (मुंबई) मुळे (औरंगाबाद) आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी प्रामुख्याने मुख्याध्यापक संघाने दिलेल्या सहकार्याबद्दल तसेच संस्था चालक, सर्व शिक्षक संघटना शिक्षकेतर संघटना आदिंनी केलेल्या सहकार्याबद्दल आंदोलन कृती समितीने आभार व्यक्त केले.

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी, दैनिक ......................
महोदय
उपरोक्त वृत्त आपले लोकप्रिय दैनिकामध्ये प्रकाशित करावे ही विनंती

आपला
**(डॉ.अनिल वऱ्हाडे)** कार्याध्यक्ष

पूर्णवेळ लायब्ररीयन राहणार नाही. १००१ ते २००० पर्यन्त विद्यार्थी असतील तर अर्धवेळ आणि २००० पेक्षा जास्त विद्यार्थी असतील तर पूर्णवेळ असे म्हटले आहे. सर्वात महत्वाची आणि दखल घेण्यासारखी बाब ही नॉन टिचींगच्या संदर्भात आहे. नॉन टिचिंगची जी पदे आहेत त्यामध्ये ८ ते १० तुकडया असतील तर १ पद, ८ ते १२ तुकडया असतील तरी एकच पद आणि इयत्ता पाचवी ते दहावीची शाळा असेल तर एकच चपराशी मिळेल. त्यानेच इकडेही बघावयाचे आणि प्रयोगशाळेमध्येही काम करावयाचे. तो सुटीवर गेला तर कोणाला बोलवावयाचे हे ठरवावे लागेल किंवा मंत्रालयातून कर्मचारी बोलवावा लागेल. म्हणजे नॉन टिचिंगची ५० ते ६० टक्के पदे रद्द केली. मात्र यांनी शेवटी असे म्हटले आहे की, आम्ही संरक्षण दिलेले आहे. पगार काढतांना अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या पे बिलामध्ये लाल शाईने त्याचे नाव लिहून पगारपत्रक सादर करावे लागते. आज महाराष्ट्रामध्ये अशी स्थिती आहे की अतिरिक्त झालेले कर्मचारी ॲबसॉर्ब करण्यासाठी अजिबात जागा नाही. ज्या विद्वानांनी आपल्या डोक्याला ताण देऊन हा जी.आर. काढलेला आहे, महाराष्ट्राचे शैक्षणिक क्षेत्र बुडविण्यासाठी, कर्मचाऱ्यांना भिकारी करण्यासाठी, त्यांना उपाशी ठेवण्यासाठी काढलेला हा जी.आर रद्द करणे आवश्यक आहे. हा माझा एकटयाचा प्रश्न नाही. हा सर्व सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. हा जी.आर. तावडतोब रद्द केला जाईल काय ?

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारचा जी.आर. शासनाने नुकताच काढलेला आहे जी.आर.काढत असताना सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, १ लाख पर्यन्त पदे कमी होणार आहेत, व्यपगत होणार आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगेन की, अशा प्रकारचा जी.आर.काढल्यानंतर पदांचा आढावा घेण्याचे काम चालू आहे. अजूनही किती पदे.....

**श्री.बी.टी.देशमुख :** म्हणजे आढावा घेतला नाही....

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** जर आढावा घेतला नसेल तर....

**श्री. राजेंद्र शिंगणे :** आढावा घेण्याचे काम पूर्ण होत आलेले आहे. ही संख्या १ लाखापर्यन्त जाईल अशातील भाग नाही. त्याच्यानुसार ही संख्या १ लाखापर्यंत जाईल अशातील भाग नाही. राज्यामध्ये एवढया मोठया संख्येने पदे रद्द होतील अशातील भाग नाही. मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे या जी.आर.प्रमाणे आढावा घेतल्यानंतर जी पदे अतिरिक्त ठरतील त्यांना शासन कमी करील अशातील भाग नाही, त्यांना अन्य शाळा व महाविद्यालयामध्ये सामावून घेतले जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट झालेली आहे की आढावा न घेताच हा जी.आर.निघाला आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाला नेस्तनाबूत करण्याचे हे कारस्थान आहे. मंत्रीमंडळात निर्णय न होताच हा एवढा महत्वाचा शासन निर्णय निघाला. मंत्रिमंडळामध्ये याबाबतचा निर्णय घेतला असेल तर तो केव्हा घेतला? त्याची तारीख काय आहे ? त्यानुसार हा जी.आर.निघाला आहे काय? आणि मंत्रिमंडळाने निर्णय घेतला नसेल तर त्या अधिका-यांना त्यांची जागा दाखवून द्या, हा जी.आर.स्थगित करावा अशी मागणी मी करणार नाही तर तो तावडतोब रद्द करावा. अशी माझी मागणी आहे. त्यानंतर आढावा घेऊन सर्वांशी चर्चा करुन काय निर्णय घ्यायचा तो निर्णय घ्यावा. वर्षानुवर्षे शिक्षणक्षेत्रात काम केलेली ही माणसे आहेत, हा शासन निर्णय रद्द केल्याने कोणी नरकात जाणार नाही. शिक्षण क्षेत्रात काम केलेल्या लोकांशी चर्चा करावी. म्हणून माझी मागणी आहे की, मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला व मंत्रिमंडळाच्या निर्णयाशिवाय हा जी.आर.काढला असेल तर तो रद्द केला जाईल काय ?

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मंत्रिमंडळाने कोणत्या तारखेला निर्णय घेतला याची तारीख माझ्याजवळ नाही. याबाबत निर्णय घेत असताना शासनाने एक उच्चाधिकार समिती नेमली होती.

**श्री.बी.टी.देशमुख :** ही उच्चाधिकार समिती मंत्र्यांची होती की अधिका-यांची होती ?

**श्री.राजेंद्र शिंगणे :** अधिका-यांची ही उच्चाधिकार समिती होती. या उच्चाधिकार समितीने हा निर्णय घेतला होता. मंत्रिमंडळाने केव्हा निर्णय घेतला त्याची तारीख माझ्याजवळ नाही. मा.सदस्यांनी सूचना केली आहे त्याप्रमाणे राज्यातील संस्थाचालक, नामवंत शिक्षण तज्ज्ञ, यांच्याबरोबर बसून चर्चा करुन निर्णय घेतला जाईल तोपर्यंत हा जी.आर.स्थगित करतो.

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

**श्री.बी.टी.देशमुख :** हेच तर कटकारस्थान आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देण्यापूर्वी मी हे सांगितले होते. मला चर्चा ऐकावयास मिळाली आहे ती अशी की, सभागृहात फारच चर्चा झाली, विरोध झाला, तर हा जी.आर.स्थगित करावा, रद्द करु नये. असे अधिकाऱ्यातर्फे सांगण्यात आले आहे. हा त्या अधिका-यांचा निर्णय आहे. सचिवांची ही उच्चाधिकार समिती असेल तर तुम्ही तुमचा उच्चाधिकार त्यांना दाखवावा. मंत्रिमंडळाने याबाबत निर्णय घेतलेला नसल्यामुळे हा शासन निर्णय आजच्या आज रद्द करावा.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मंत्रिमंडळाने नेमलेली ही उच्चाधिकार समिती आहे.

**श्री,बी.टी.देशमुख :** मंत्रिमंडळाने नेमलेली ही सचिवांची उच्चाधिकार समिती असली तरी त्या समितीला संपूर्ण राज्याला जाळण्याचा अधिकार दिला आहे काय ? त्या गरीब कर्मचाऱ्यांना २० रुपये तासाने काम करण्यास सांगता? माझे म्हणणे आहे की, अधिकाऱ्यांना त्यांची जागा दाखवा. त्यांना सांगा की, तुम्ही आमच्याकडे आल्याशिवाय जी.आर.कसा काढला? त्याची चौकशी करावी, जबाबदारी निश्चित करावी आणि हा जी.आर.तावडतोब रद्द करावा.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** मी सुरुवातीला सांगितले की, याबाबत निर्णय घेत असताना आपण राज्यातील शिक्षण क्षेत्रातील नामवंतांशी चर्चा करुन निर्णय घेणार आहोत. तोपर्यंत हा निर्णय लागू करीत नाही, तोपर्यंत हा जी.आर.स्थगित ठेवला आहे.

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

**श्री.बी.टी.देशमुख :** जी.आर.स्थगित ठेवणे हा त्या मोठ्या कारस्थानाचा भाग आहे. आज स्थगित करण्यात येत आहे असे म्हणायचे व चार दिवसांनी स्थगिती उठविली आहे असे म्हणायचे असे हे कारस्थान आहे.

**श्री. शिवाजी पाटील :** राज्याचे माजी शिक्षण संचालक श्री. चिपळूणकर यांनी शाळा उत्तम प्रकारे चालाव्यात यासाठी अतिशय विचारपूर्वक हा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा आता जो निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे तो आजच्या आज रद्द करायला पाहिजे.

**श्री. राजेंद्र शिंगणे :** सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता, तसेच शिक्षण क्षेत्रात काम करणा-या सर्व मान्यवरांचा विचार लक्षात घेता शासन हा निर्णय रद्द करीत आहे.

******

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO.** NR/ATI/78/2002 Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **28.02.2004**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,.............................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................